# महाराष्ट्र विधानपरिषद

## चौथे अधिवेशन, २०१७

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**सोमवार, दिनांक १८ डिसेंबर, २०१७ / अग्रहायण २७, १९३९ (शके)**

**(१) वित्त व नियोजन, वने मंत्री**
**(२) ग्रामविकास, महिला व बालविकास मंत्री**
**(३) वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री**
**(४) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री**
**(५) जलसंधारण, राजशिष्टाचार, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री**
**(६) रोजगार हमी, पर्यटन मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - १०८**

---

**विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याने वैद्यकीय व अभियांत्रिकीचे प्रवेश रद्द केल्याबाबत**

**(१) * ३४६७७ श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि इतर मागासवर्ग (ओबीसी) प्रवर्गातील ३५३ विद्यार्थ्यांनी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याने सन २०१७ मधील वैद्यकीय व अभियांत्रिकीचे प्रवेश रद्द करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जावू नये यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे. संविधानिक आरक्षणाव्दारे प्रवेश मिळविण्यासाठी जात वैधता प्रमाणपत्र सादर न करता हमीपत्राच्या आधारे वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमाचे प्रवेश करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने आदेश पारित केले होते. सदर आदेशास मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०४/०८/२०१७ रोजी स्थगिती दिली होती. त्यानुषंगाने जात वैधता प्रमाणपत्र नसणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द समजण्यात येतील असे आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी नोटीशीव्दारे जाहीर केले होते. त्यामध्ये सर्व प्रवर्गातील एकूण ३५३ उमेदवारांचा समावेश होता. तथापि, त्यानंतर सदर यादीतील ज्या उमेदवारांनी विहीत मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर केले, अशा उमेदवारांना प्रवेशासाठी पात्र समजण्यात आले आहे.

अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द केलेले नाहीत.
(२) मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या व मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार प्रवेशासाठी निवड यादया प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात कर्जमाफी जाहिर केल्यामुळे होणारी आर्थिक तुट दूर करण्याबाबत

**(२) * ३५९७६ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने शेतकऱ्यांसाठी ३४ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी जाहिर केल्यामुळे विकासकामांवरील व अन्य काही खर्चात शासनास किमान ३० टक्के कपात करावी लागणार असून शासकीय कर्मचाऱ्यांची सातव्या वेतन आयोगाची मागणी असून हा वेतन आयोग लागू केल्यास आर्थिक तुट निर्माण होणार असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी राज्यात निर्माण होणारी आर्थिक तुट दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनांतर्गत रुपये ३४,०२२ कोटी इतका निधी तातडीने द्यावयाचा असल्याने व हा खर्च प्राथम्याने करावयाचा असल्याने खुल्या बाजरातून रुपये २०,००० कोटी इतके अधिकचे कर्ज उभारणीस अनुमती देण्याची केंद्र शासनास विनंती करण्यात आलेली आहे.

राज्य शासनाने अर्थसंकल्पीत केलेला महसूल व खर्च यांचे योग्य नियोजन करण्यासाठी मासिक निधी विवरणपत्र तयार करण्यात येते. त्यानुसार दर महिन्याला जमा होणाऱ्या निधीच्या अनुषंगाने मासिक खर्चाचे ढोबळमानाने अंदाज तयार करण्यात येतात. राज्य शासनाला मोठया प्रमाणावर महसूल आर्थिक वर्षाच्या शेवटच्या महिन्यात म्हणजेच मार्च मध्ये उपलब्ध होतो. त्यानुषंगाने तसेच प्राधान्याने हाती घ्यावयाची कामे या बाबींचा सर्वंकष विचार करुन शासनाने दिनांक ३०/६/२०१७ व ८/८/२०१७ च्या परिपत्रकाद्वारे महसूली लेख्यातील निधी ७० टक्के तसेच भांडवली लेख्यातील निधी ८० टक्के इतका निधी आर्थिक वर्षाच्या पहिल्या नऊ महिन्यांकरीता प्रशासकीय विभागांना उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

केंद्र शासनाच्या ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र शासनाने केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांना विहित केलेल्या वेतन श्रेणीच्या अनुषंगाने राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणीची शिफारस करण्याकरीता राज्य शासनाने श्री.के.पी. बक्षी, सेवानिवृत्त अपर

मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वेतन सुधारणा समिती २०१७ गठीत केली असून या समितीचा अहवाल राज्य शासनास अद्याप अप्राप्त आहे.

-----------------

## रायगड जिल्हयाच्या पर्यटन विकासाला चालना मिळण्याबाबत

**(३) * ३५५८७ श्री.जयंत पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील ५९ गावांच्या पर्यटन विकासासाठी प्रादेशिक पर्यटन विकास कार्यक्रमांतर्गत २४३ कोटींचा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आराखडा तयार करण्यासाठी कन्सल्टंन्ट इंजिनिअर सर्व्हीसेस, पुणे या संस्थेची नेमणूक करण्यात आली असून सन २०१३-१४ या दरम्यान सदर आराखडा शासनाच्या मंजूरीसाठी पाठविण्यात आला असून शासनाने त्यास मंजूरी दिली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच आराखडयास मंजूरी न मिळण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, रायगड जिल्ह्यातील ५९ गावांच्या पर्यटनाच्या विकास करण्यासाठी तसेच आराखड्यास मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) होय, मात्र सदर आराखडा पर्यटन स्थळांचा आहे.

(२), (३) व (४) रायगड जिल्ह्याच्या पर्यटन विकास आराखड्याबाबत शासन निर्णयास मान्यता घेणे व तो निर्गमित करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

-----------------

## शिवाजीनगर (जि.पुणे) परिसरातील सुधारगृहात अल्पवयीन अनाथ मुलांचे लैंगिक शोषण झाल्याबाबत

**(४) * ३५११५ ॲड.जयदेव गायकवाड : तारांकित प्रश्न क्रमांक ३२६०५ ला दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवाजीनगर (जि.पुणे) परिसरातील सुधारगृहात अल्पवयीन अनाथ मुलांचे लैंगिक शोषण झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) शिवाजीनगर (जि.पुणे) येथील शासन मान्य बालसुधारगृहात ई-लर्निगच्या पडदयावर अश्लिल चित्रफित दाखवून अनाथ मुलांचे लैंगिक शोषण झाल्याबाबतचे प्रकरण मे, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे.

सदर प्रकरणी विभागीय उपआयुक्त (म.व.बा.वि) पुणे विभाग यांच्या अध्यक्षतेखाली त्रिस्तरीय समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने त्यांच्या दिनांक २२/०७/२०१७ च्या पत्रानुसार सदर प्रकरणाची चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल आयुक्तालयास सादर केलेला आहे. चौकशी अहवालानुसार पुढील कारवाई आयुक्त, महिला व बालविकास यांच्यास्तरावरून करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## देवना (ता.येवला, जि.नाशिक) सिंचन प्रकल्पाच्या सर्वसाधारण आराखड्यास प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत

**(५) * ३४८८६ श्री.जयवंतराव जाधव : तारांकित प्रश्न क्रमांक २७१८४ ला दिनांक २३ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवना (ता.येवला, जि.नाशिक) सिंचन प्रकल्पाच्या सर्वसाधारण आराखड्यास मान्यता मिळाली असूनही या प्रकल्पाची प्राथमिक अन्वेषण टिप्पणी माहे ऑक्टोबर, २०१७ पर्यंत तापी पाटबंधारे विकास महामंडळाकडे मान्यतेसाठी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पाबाबत तातडीने कार्यवाही करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास तापी पाटबंधारे विकास महामंडळाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेचे अंदाजपत्रक सर्वसाधारण आराखडा शासनाकडे प्रशासकीय मंजुरीसाठी पाठविण्याबाबत महामंडळाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) नाही.

(२) होय.

(३) या योजनेच्या अंदाजपत्रकासाठी क्षेत्रियस्तरावर आवश्यक प्राथमिक सर्वेक्षण व अन्वेषण पूर्ण झाले आहे. योजनेच्या सर्वसाधारण आराखड्यास सक्षम स्तरावरुन मान्यता देण्यात आली आहे. बुडीत क्षेत्रातील वन जमीन संपादनासाठी आवश्यक संयुक्त मोजणी पूर्ण करण्यात आली आहे.

योजनेच्या माती धरणाचा काटछेद संकल्पन प्रस्तावावर मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांनी उपस्थित केलेल्या शेऱ्यांची पूर्तता करुन सुधारीत प्रस्ताव त्यांच्याकडे दिनांक २४/०७/२०१७ रोजी पाठविण्यात आला. मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचेकडुन संकल्पन प्राप्त झालेवर योजनेची व्यवहार्यता तपासून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्हयात रोजगार हमी योजनेंतर्गत जेसीबीने केलेल्या कामावर बनावट नावे टाकून मजूरी घेतल्याबाबत

**(६) * ३५१८७ श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामात गैरव्यवहार झाल्याचे सामाजिक कार्यकर्त्यांनी माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी हिंगोली यांच्याकडे लेखी तक्रारी केल्या आहेत तसेच हिंगोली तालुक्यातील येळी येथे रोजगार हमी योजनेंतर्गत जेसीबीने केलेल्या कामावर मजूरांची नावे कागदोपत्री नोंद करुन काही मजूर हयात नसताना जॉब कार्डावर त्यांची नावे टाकून त्यांच्या नावाने २ वर्षापूर्वी मजूरी घेतल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) अंशत: खरे आहे.

(२) तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली असता काही प्रकरणात नियमबाहय मजूरी प्रदान झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्या अनुषंगाने ग्रामरोजगार सेवक हे दोषी आढळून आल्याने त्यांच्याकडून अतिप्रदानाची रक्कम रुपये ९६२/- इतकी वसूल करण्यात येऊन, त्यांना सेवेतून कमी करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात बालमृत्यू होत असल्याबाबत

**(७) * ३५७८३ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.रामराव वडकुते, श्री.बाळाराम पाटील, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक बालविकास सेवा योजनेच्या माहे एप्रिल, २०१७ च्या अहवालानुसार राज्यात एप्रिल या एकाच महिन्यात एकूण १ हजार २३६ बालमृत्यूंची नोंद झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यातील ० ते १ वयोगटातील मुलांची संख्या ९१६ असून १ ते ५ वर्षातील बालमृत्यू ३२० असून ७९ हजार ६१९ मुले तीव्र कुपोषित गटात आहेत, तसेच राज्यात ८० हजार तीव्र कुपोषित गटातील बालकांना पोषण आहार मिळत नसल्याने त्यांच्या जिवीतास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच राज्यातील एकात्मिक बालविकास सेवेमधील (आय.सी.डी.एस.) गाव ते तालुका पातळीवरील ९००० आणि ३६६ प्रकल्पांना बालविकास अधिकारी यांची पदे रिक्त असून यामुळे राज्यात ७९६१९ मुले तीव्र कुपोषित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार तीव्र कुपोषित गटातील संभाव्य बालमृत्यू रोखण्यासंदर्भात तसेच बालविकास अधिकारी यांची पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

बालमृत्यू हे कुपोषणामुळे झालेले नसून विविध आजार व संसर्गजन्य आजार इत्यादीमुळे झालेले आहेत.

(३) राज्यातील एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत बालविकास प्रकल्प अधिकारी यांची ३५२ पदे रिक्त आहेत. तसेच मुख्य सेविका-७१५ पदे, अंगणवाडी सेविका-१६२०, मिनी अंगणवाडी सेविका-१३३९ व मदतनीस-५१७२ एवढी पदे रिक्त आहेत.

(४) राज्यातील एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत असलेल्या अंगणवाडीतील ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील लाभार्थी, गर्भवती स्तनदा माता, तीव्र कमी वजनाची मुले यांना THR व ३ वर्ष ते ६ वर्ष वयोगटातील लाभार्थ्यांना गरम ताजा आहाराचा पुरवठा नियमित करण्यात येतो.

बालविकास प्रकल्प अधिकारी यांची रिक्त पदे भरण्याबाबत महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाकडे मागणी पत्र सादर करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनाथालयातील विद्यार्थ्यांच्या समस्यांबाबत

**(८) * ३४९०३ श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नोंदणीकृत अनाथालयांची संख्या मोठी असून यामध्ये हजारो अनाथ बालकांची निवास व शिक्षणाची सोय केली जात असून अनाथालयातून शिक्षण घेवून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना समाजात जात, धर्म, पालक आदींचा कोणताही आधार नसल्यामुळे अडचण होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील नोंदणीकृत अनाथालयातुन शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना नोकरीमध्ये योग्य आरक्षण देण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी आरक्षण देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच अनाथालयातून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी कोणकोणत्या सुविधा व सवलती देणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

तथापि, राज्यामध्ये बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या कलम ४१ अंतर्गत काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांसाठी शासकिय व स्वंयसेवी संस्थांमार्फत बालगृहे कार्यान्वित आहेत. सदर बालगृहांमध्ये संबंधित जिल्हयाच्या बाल कल्याण समितीमार्फत अंतिम पर्याय म्हणून प्रवेश देण्यात येतो. या बालकांना संस्थेमार्फत अन्न, वस्त्र, निवारा, वैद्यकिय, शैक्षणिक, मनोरंजनात्मक सुविधा पुरविण्यात येतात. या बालगृहांमधून वयाची १८ वर्ष पुर्ण झाल्यानंतर बालकाला अधिक पुनर्वसनाची गरज भासल्यास त्यांना वयाच्या २१ वर्ष पुर्ण होईपर्यंत अनुरक्षणगृहाच्या माध्यमातून उपरोक्त सोयी सुविधा पुरवून पुनर्वसन करण्याचा प्रयत्न करण्यात येतो.
(२) हे खरे आहे.
(३) अनाथ मुलांना नोकरीमध्ये आरक्षण देणेबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. तसेच शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग क्र. संकीर्ण-२०१३/प्र.क्र.१०९/का-३, दिनांक ०६ जून, २०१६ अन्वये अनाथ बालकांना अनाथ असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार आयुक्तालय स्तरावरुन अनाथ प्रमाणपत्र देण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी गिरणा खोऱ्यात वळविण्याबाबत

**(९) * ३५०९७ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३२०७९ ला दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नार, पार, औरंगा, अंबिका या पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी गिरणा खोऱ्यात वळविण्याबाबतच्या योजनेच्या सर्वेक्षण व अन्वेषण कामाच्या रुपये ३६३ कोटी किंमतीच्या अंदाजपत्रकास शासनाने दिनांक २३ डिसेंबर, २०१४ रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेच्या सर्वेक्षण व अन्वेषणाचे प्रगतीपथावरील काम पुर्ण झाले आहे काय,

(३) असल्यास, नार-पार-औरंगा-अंबिका-गिरणा उपसा जोड सिंचन योजनेचे सविस्तर सर्वेक्षण व अन्वेषणाचे काम करण्यासाठी वॅपकॉस लिमिटेड, दिल्ली (भारत सरकार उपक्रम) यांचेशी दिनांक ८ डिसेंबर, २०१६ रोजी करण्यात आलेल्या सामंजस्य करारानुसार सदर सर्वेक्षण व अन्वेषण करावयाच्या कामाची रक्कम रुपये ३२६.४२ लक्ष इतकी अंतिम करण्यात आली असून सदर प्रगतीत असलेले काम पूर्ण झाले आहे काय,

(४) असल्यास, या कामाची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) होय.

(२) व (३) सर्वेक्षण व अन्वेषणाचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) सर्वेक्षण व अन्वेषणाची सद्य:स्थिती पुढीलप्रमाणे :-

योजनेच्या १८ धरणांपैकी ९ धरणांचे सर्वेक्षण पुर्ण करुन सल्लागार अभिकरणाने सर्वेक्षण रेखाचित्रे विभागास दिली आहेत. उर्वरित ९ धरणांचे सर्वेक्षण अंतिम टप्प्यात आहे. योजनेतील धरणांसाठी करावयाचे अन्वेषण वन विभागाच्या हद्दीत असून त्यासाठी आवश्यक वन विभागाची परवानगी घेण्याची कार्यवाही सामंजस्य करारानुसार WAPCOS LTD, नवी दिल्ली यांनी करावयाची असुन त्यांचेमार्फत सदर कार्यवाही सुरु आहे. परवानगी प्राप्त होताच विंधन विवराचे काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

## नाशिक व ठाणे येथील जिल्हा शासकिय रुग्णालयात बालकांचा मृत्यू झाल्याबाबत

**(१०) * ३५४३२ श्री.धनंजय मुंडे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.आनंदराव पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.जनार्दन चांदूरकर, डॉ.अपूर्व हिरे, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील, आर्कि.अनंत गाडगीळ, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात इन्क्युबेटर, व्हेंटिलेटर यासह अनेक अपुऱ्या असलेल्या वैद्यकीय सुविधा व तज्ञ डॉक्टरांची कमतरता इत्यादींमुळे गत ५ महिन्याच्या कालावधीत २२५ नवजात बालकांचा मृत्यू झाला असून उक्त रुग्णालयात अतिदक्षता कक्षाची उभारणी वृक्षतोडीला परवानगी न मिळाल्याने प्रलंबित असल्याचे दिनांक १२ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच ठाणे येथील सिव्हील रुग्णालयात गेल्या सहा महिन्यात व्हेंटिलेटर व इन्क्युबेटर नसल्यामुळे ४७ बालकांचा मृत्यू झाला असून याबाबत जिल्हा शल्यचिकित्सक यांना माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदन देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच नाशिक महानगरपालिकेच्या ३ रुग्णालयामध्ये १७ इन्क्युबेटर बंद असून नाशिक जिल्ह्यात वैद्यकीय अधिकाऱ्यांची ६८ पदे रिक्त असून ५ जिल्ह्यासाठी सुरु करण्यात आलेल्या विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयातील अनेक उपकरणे नादुरूस्त असल्याने खाजगी रुग्णालयातून तपासणी करुन घ्यावी लागत असल्याने रुग्ण, नातेवाईकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) अर्भक मृत्यूंवर नियंत्रण आणण्यासाठी नाशिकसह अमरावती व चंद्रपूर येथील जिल्हा रुग्णालयात लेव्हल थ्री चे एनआयसीयु सुरु करण्याचा शासनाने दिनांक ११ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निर्णय घेवूनही माहे ऑक्टोबर, २०१७ पर्यंत सदर एनआयसीयु सुरु झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच ठाणे व नाशिक येथील शासकीय व महानगरपालिका रुग्णालयात आवश्यक उपचार सुविधा, अद्ययावत यंत्र सामुग्री आणि पुरेशा संख्येने वैद्यकीय अधिकारी व संलग्न कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणेबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

नाशिक जिल्हा रुग्णालयातील एसएनसीयू मध्ये माहे एप्रिल ते ऑगस्ट या कालावधीत २२७ बालकांचा मृत्यू झाला आहे, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नवजात बालकांच्या व्यवस्थापनासाठी त्रिस्तरीय सेवेची कार्यप्रणाली अपेक्षित आहे. यानुसार डिलीव्हरी पॉईंटला नवजात काळजी कोपरा, तालुकास्तरावर नवजात स्थिरीकरण कक्ष व जिल्हास्तरावर विशेष नवजात काळजी कक्ष अपेक्षित आहेत. यानुसार जिल्हा रुग्णालय, नाशिक येथे विशेष नवजात काळजी कक्ष कार्यान्वित असून या कक्षात इनबॉर्न युनिट व आऊट बॉर्न युनिटमध्ये बालके दाखल होतात. नाशिक एसएनसीयू मध्ये केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार रेडियन्ट वॉर्मर उपलब्ध असून व्हेंटिलेटर सुविधा फक्त वैद्यकीय महाविद्यालयातील नवजात अतिदक्षता विभागात अपेक्षित आहे.

आयुक्त, महानगरपालिका नाशिक यांनी सप्टेंबर, २०१७ मध्ये उच्च न्यायालयाच्या परवानगीच्या अधीन राहून मान्यता दिली आहे. मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

ठाणे जिल्हा रुग्णालयामध्ये अपुऱ्या दिवसाचे बाळ, जन्मत: श्वासावरोध, श्वसनाचा आजार, जन्मत: विकृती, जंतू संसर्ग व न्यूमोनिया इत्यादी कारणांनी एप्रिल ते ऑगस्ट, २०१७ या पाच महिन्यात ४७ बालमृत्यू झाले.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) हे अंशत: खरे आहे.

(५) जिल्हा रुग्णालय, नाशिक व ठाणे येथे दाखल होणाऱ्या रुग्णांकरिता विशेष कक्षांची निर्मिती करण्यात आली आहे. तसेच तेथे १४ विशेषतज्ञ सेवा उपलब्ध करुन दिल्या जात आहेत. नाशिक जिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी वर्ग-१ व २ यांची ६३ मंजूर पदांपैकी ५३ पदे भरली आहेत. तसेच वर्ग-३ व ४ यांची ५९२ मंजूर पदांपैकी ४९१ पदे भरली आहेत. सामान्य रुग्णालय, ठाणे वैद्यकीय अधिकारी वर्ग-१ व २ यांची ५३ मंजूर पदांपैकी ४० पदे भरली आहेत. तसेच वर्ग-३ व ४ यांची ४६६ मंजूर पदांपैकी ३६३ पदे भरली आहेत. ठाणे येथील शासकीय व नाशिक येथील शासकीय व महानगरपालिका रुग्णालयात आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध असून रुग्णांना उपचार दिले जातात. दाखल होणाऱ्या बालकांची संख्या व बेड ऑक्युपेन्सी दर लक्षात घेता अतिरिक्त १८ रेडीयंन्ट वॉर्मर, २ फोटोथेरपी युनिट, ३ सिरीज पंप व २ सीपॅप मशीन पुरविण्यात आल्या असून १८ अतिरिक्त स्टाफ नर्सेस मंजूर करण्यात आल्या आहेत. तसेच रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विदर्भातील विविध जंगलात वाघांचा मृत्यू झाल्याबाबत

**(११) * ३४८०४ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील विविध जंगलात मागील आठ महिन्यात १२ वाघांचा मृत्यू झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार वाघांच्या मृत्यूस कारणीभूत असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) विदर्भातील विविध जंगलात माहे जानेवारी, २०१७ ते ऑगस्ट, २०१७ या आठ महिन्यांच्या कालावधीत नैसर्गिकरीत्या १०, शेतात लावलेल्या विद्‌युत प्रवाहामुळे २ तर इतर ३ असे एकूण १५ वाघांचे मृत्यू झालेले आहेत.
(२) आपसी झुंज, आजारपण, वृध्दापकाळ अशा विविध कारणामुळे १० वाघांचा नैसर्गिकरीत्या मृत्यू झाला आहे.

शेतात लावलेल्या विद्‌युत प्रवाहाने खालीलप्रमाणे २ वाघांचा मृत्यू झाला आहे.

नागपूर वन विभागातील खापा वनपरिक्षेत्रातील श्री.बुरडे रा.खापा यांचे शेतात लावलेल्या विद्‌युत प्रवाहाने दिनांक १३/०१/२०१७ रोजी एका वाघीणीचा मृत्यू झाला असून प्रस्तूत प्रकरणी वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ मधील तरतूदीनुसार दोन इसमांविरुध्द, वनगुन्हा नोंदविण्यात आला असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

ब्रम्हपुरी वन विभागातील नागभिड वनपरिक्षेत्रातील श्री.महादेव बाबुराव इरपाते रा. कोथुळणा यांचे शेतात लावलेल्या विद्‌युत प्रवाहाने दिनांक २०/०४/२०१७ रोजी एका वाघाचा मृत्यू झाला असून प्रस्तूत प्रकरणी वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ मधील तरतूदीनुसार तीन इसमांविरुध्द वनगुन्हा नोंदविण्यात आला असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

पेंच व्याघ्र प्रकल्पातील पूर्व पेंच पिपरिया येथे दिनांक २६/६/२०१७ रोजी गस्ती दरम्यान वनपरिक्षेत्र अधिकारी, पवनी (वन्य/जीव) यांनी वाघाची हाडे, नखे व दात जप्त केली. त्यानुषंगाने दिनांक २६/०६/२०१७ रोजी गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी पुढील चौकशी दरम्यान एकूण ३ वाघांच्या मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे. उपरोक्त प्रकरणांमध्ये १७ आरोपींना अटक करण्यात आली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईच्या वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टर ग्रामीण भागात जाण्यास तयार होत नसल्याबाबत

**(१२) * ३४७४३ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून शिक्षण घेतल्यानंतर प्रत्येक डॉक्टरला एक वर्षाचा बंधपत्र पूर्ण करण्यासाठी मेळघाट, गडचिरोली, मोखाडा, गोंदिया या ग्रामीण भागांमध्ये पाठविले जाते, परंतू अनेक डॉक्टर ग्रामीण भागात वैद्यकीय सेवा देण्यास तयार होत नसल्याने वैद्यकीय शिक्षण विभागाने बंधपत्र पूर्ण करण्याबाबत नविन नियमावली जारी केली आहे, तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून शिक्षण पूर्ण केल्यानंतर बंधपत्र पूर्ण न करणाऱ्या डॉक्टरांच्या नोंदणीच्या नुतनीकरणाला स्थगिती दिली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच पदवी व पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर राज्यातील ग्रामीण भागांमध्ये सेवा देणे बंधनकारक असतांना मुंबईच्या वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टर ग्रामीण भागात जाण्यास तयार नाहीत तसेच मुंबईतील ग्रॅन्ट मेडीकल महाविद्यालय, लोकमान्य टिळक, सेठ जी.एस., टोपीवाला नॅशनल वैद्यकीय महाविद्यालय आणि कळवा येथील राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टरांचा यामध्ये समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नोंदणीचे नुतनीकरण न करताच वैद्यकीय सेवा करणाऱ्या राज्यातील सुमारे ४५०० डॉक्टरांवर कारवाई करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील सार्वजनिक तसेच पालिका वैद्यकीय महाविद्यालयातून पदवी तसेच पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण घेतलेल्या किती डॉक्टरांनी अद्याप ग्रामीण भागात सेवा दिलेली नाही, तसेच नविन नियमावलीनुसार आतापर्यंत किती डॉक्टरांवर कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार ग्रामीण भागात सेवा न देणाऱ्या डॉक्टरांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे.
(२) राज्यातील शासकीय/महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालयांतून अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या काही उमेदवारांनी बंधपत्रित सेवा केली नसल्याचे निदर्शनास आले आहे. यामध्ये मुंबईतील शासकीय/महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालयातील उमेदवारांचा देखील समावेश आहे.
(३) होय. सदर सर्व उमेदवारांना महाविद्यालयांमार्फत नोटीसा बजाविण्यात आलेल्या आहेत.
(४) व (५) गत पाच वर्षाची आकडेवारी लक्षात घेता पदवी अभ्यासक्रमाचे ९,३७३ व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे १,३०० आणि अतिविशेषोपचार अभ्यासक्रमाचे १० उमेदवार अशा एकूण १०,६८३ उमेदवारांनी बंधपत्रित सेवा केली नसल्याचे निदर्शनास येत आहे.

बंधपत्रित सेवा न करणाऱ्या उमेदवारांना महाराष्ट्र वैद्यक परिषदेच्या नोंदणीचे नुतनीकरण करुन देण्याच्या वेळेस बंधपत्रमुक्त केल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच, ज्या डॉक्टरांना नोंदणीचे नुतनीकरण प्राप्त होणार नाही, त्यांना बोगस डॉक्टर म्हणून समजण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. तशा महाविद्यालयांमार्फत बंधपत्रित सेवा न करणाऱ्या उमेदवारांना नोटीसा जारी करण्यात आलेल्या आहेत.

-----------------

## मराठवाडा विभागात सिंचन प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या संपादित केलेल्या जमिनीचा मावेजा देण्याबाबत

**(१३) * ३५३७८ श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक ३२१६६ ला दिनांक २८ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा विभागात सिंचन विभागाकडुन लघु व मध्यम २८६ सिंचन प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करुन प्रकल्पाचे कामे पुर्ण केले असून शेतकऱ्यांना संपादित जमिनीचा मावेजा रुपये १२५० कोटी असून मा.न्यायालयाने आदेश देवुनही शेतकऱ्यांना मावेजा दिला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शेतकऱ्यांचा मावेजा देण्याबाबत कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) व (२) दिनांक ४/१०/२०१६ रोजी औरंगाबाद येथे झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीतील झालेल्या विषयानुसार रुपये १२५४.०० कोटी रकमेच्या मागण्या गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या विविधस्तरावर प्रलंबित असून त्यामध्ये संपादित जमिनीचा वाढीव मावेजा न्याय निर्णयानुसार अंतर्भाव आहे. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात तरतूद उपलब्ध नसलेल्या प्रकल्पासाठी भूसंपादन व न्यायालयीन प्रकरणे ठोक तरतूद मराठवाडा अंतर्गत रुपये ७८.३३०७ कोटी तसेच विशेष बाब म्हणून प्राप्त रुपये निधी २५.३४४९ कोटी व तरतुद उपलब्ध असलेल्या प्रकल्पांच्या भुसंपादनासाठी रुपये ३०२.४९८० कोटी निधी असा एकूण ४०६.१७३६ वितरीत करण्यात आला आहे. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील भुसंपादन व न्यायालयीन प्रकरणे ठोक तरतुद मराठवाडा अंतर्गत रुपये ३५१.६०१७ कोटी व भुसंपादनासाठी पुनर्वितरणाव्दारे व विशेष बाब मराठवाडयासाठी एकूण रुपये १६१.६२४८ कोटी तरतूद उपलब्ध असलेल्या प्रकल्पांच्या भूसंपादनासाठी एकूण (महामंडळ) असा एकूण ६७८.६२९ कोटी उपलब्ध करून दिलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत

**(१४) * ३५२१७ श्री.कपिल पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.दत्तात्रय सावंत, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व आस्थापनातील शासकीय कर्मचारी, निमशासकीय कर्मचारी आणि अनुदानित शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांना सातवा वेतन आयोग लागू करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ चा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवालाच्या सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, अहवाल देण्याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) “राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७” चे प्राथमिक कामकाज सुरु आहे. प्रचलित कार्यपध्दतीनुसार राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या संघटनांकडून त्यांच्या मागण्यांची निवेदने मागवून त्यानंतर संघटनांना समितीपुढे त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. संघटनांसोबतची चर्चा पार पडल्यानंतर समिती आपला अहवाल शासनास सादर करेल. सदर कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करण्यासाठी काही कालावधी लागणे अपरिहार्य आहे.

-----------------

## जिल्हा पुरस्कार प्राप्त शिक्षकांना एक आगाऊ वेतनवाढ देण्याबाबत

**(१५) * ३५०७९ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा पुरस्कार प्राप्त शिक्षकांना दिनांक १२ डिसेंबर, २००० च्या शासन निर्णयानुसार १ आगाऊ वेतनवाढ देण्यात येत होती, परंतू ६ व्या वेतन आयोगाची वेतन निश्चिती करताना सन २००९ मध्ये वेतनवाढ स्थगित करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त प्रकरणी शिक्षकांनी औरंगाबाद खंडपीठात दाखल केलेल्या याचिकेवर मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाने दिनांक २८ ऑगस्ट, २०१७ रोजी निर्णय देऊन या सर्व जिल्हा पुरस्कार प्राप्त शिक्षकांना ४ महिन्यात वेतनवाढ देण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, न्यायालयीन आदेशान्वये जिल्हा पुरस्कार प्राप्त शिक्षकांना १ आगाऊ वेतनवाढ त्वरीत मंजूर करावी, अशी मागणी लोकप्रतिनिधी, नागपूर यांनी दिनांक ५ ऑक्टोबर, २०१७ रोजी पत्र पाठवून केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय हे खरे आहे.

(२) मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल रिट याचिका क्र. १०६२८/२०१७ मध्ये मा.न्यायालयाने दिनांक २८/८/२०१७ रोजी याचिकाकर्ते यांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे निवेदन देण्यास निर्देश दिले असून, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि प्रकरणातील प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी सदर प्रकरणी चार महिन्यात निर्णय घेण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

(३) सदर विषयाबाबत महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद यांचे दिनांक २०/९/२०१७ रोजीचे निवेदन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांच्याकडे प्राप्त झालेले आहे. त्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिगोंली यांचेकडे पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) मा.न्यायालयाच्या आदेशानूसार जिल्हा परिषद, हिंगोली यांच्याकडून कोणताही प्रस्ताव अद्याप शासनास प्राप्त झालेला नाही.

-----------------

## राज्यात जकात कर रद्द करण्यात येऊन जीएसटी लागू झाल्याबाबत

**(१६) * ३५६४२ आर्कि.अनंत गाडगीळ : तारांकित प्रश्न क्रमांक ३२१५३ ला दिनांक २८ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जकात कर रद्द करण्यात येऊन जीएसटी लागू करण्यात आल्यामुळे मुंबई महानगरपालिकेसह राज्यातील सर्वच महापालिकांच्या विकास कामांना निधी अभावी विकास कामे अडचणीत आल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेसह राज्यातील सर्वच महापालिकांची विकास कामे सुरळीत व तातडीने होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही. महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (स्थानिक प्राधिकरणांना भरपाई देण्याबाबत) अधिनियम, २०१७ नुसार जकात तसेच स्थानिक संस्था कर निरसित झाल्यामुळे महानगरपालिकेस होणाऱ्या नुकसान भरपाईची रक्कम सर्व महानगरपालिकांना अग्रिम स्वरुपात प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेपर्यंत अदा करण्यात येत आहे. नुकसान भरपाईची रक्कम विहीत मुदतीत प्राप्त होत असल्यामुळे महानगरपालिकेच्या विकास कामात अडचण उत्पन्न होत नाही.
(२) लागू नाही.
(३) लागू नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्राला पाणीपुरवठा करणारा मोहने बंधारा गाळाने भरल्याबाबत

**(१७) * ३४९२५ श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २८२६५ ला दिनांक २३ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्राला पाणीपुरवठा करणारा मोहने बंधारा ६० टक्के गाळाने भरला असून पुरेसा पाणीसाठा उपलब्ध होत नसल्याने या बंधाऱ्यातील गाळ काढण्याबाबत मा.जलसंपदा मंत्र्यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ ऑगस्ट व ३ ऑक्टोबर, २०१७ रोजी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील पाणीसाठा वाढविणे व जलस्त्रोतांच्या संरक्षणासाठी धरणांतील गाळ काढण्याचा उपक्रम राज्याच्या इतर भागात राबविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) यांत्रिकी विभागाच्या प्राप्त अहवालानुसार मोहने बंधाऱ्यांतून कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, मिरा-भाईंदर महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका यांना पिण्यासाठी सतत पाणीपुरवठा सुरु असल्याने पाणीपुरवठा बंद करुन बंधाऱ्यातील गाळ काढता येणे शक्य नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्हयातील शेतकऱ्यांना शेततळी बांधून देण्याबाबत

**(१८) * ३५८६० डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, आर्कि.अनंत गाडगीळ** : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयात मागेल त्याला शेततळे योजनेसाठी सुमारे २६ हजार अर्जांपैकी ९ हजार २०० शेततळ्यांना परवानगी मिळाल्याने उर्वरित शेतकरी या योजनेपासून वंचित असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याशिवाय जिल्हयातील सुमारे २ हजार शेततळी कृषी विभागाची परवानगी न घेता करण्यात आली आहेत, तसेच या शेतकऱ्यांना इतर योजनांतील अनुदान देण्याची तयारी असल्याचा अहवाल कृषी विभागाने मा.पालकमंत्र्यांना दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत जिल्हयाला या योजनेचे उद्दिष्टय वाढवून देण्याबाबत व कृषी विभागाची पुर्वसंमती न घेता तयार केलेल्या शेततळ्यांनाही अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) हे खरे नाही.

"मागेल त्याला शेततळे" या योजनेंतर्गत माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये २६७२९ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी ४६१५ इतके अर्ज तांत्रिकदृष्ट्या अपात्र होते. त्यानुसार ११८७४ शेततळयांच्या कामांना कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. सद्य:स्थितीत ६३३० शेततळे पूर्ण असून ५२० शेततळयांचे काम प्रगतीपथावर आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे महापालिकेसाठी भामा आसखेड धरणातून पाणी देण्याबाबत

**(१९) * ३५२५९ श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, अॅड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महापालिकेसाठी भामा आसखेड धरणातून पाणी देण्याचा घेतलेला निर्णय पाटबंधारे खात्याने रद्द केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार उक्त धरणातून पुणे महानगरपालिकेला पाणी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) पाणी आरक्षणाचे अटीतील तरतुदीनुसार ३ महिन्यात करारनामा न केल्याने पाणी आरक्षण रद्द झाले आहे.

(२) ज्ञापनातील अटीनुसार पुणे महानगरपालिकेने ३ महिन्यात करारनामा न केल्यास आरक्षण आपोआप रद्द होईल अशी तरतुद असल्याने, त्या अटीनुसार सदर संस्थेचे आरक्षण व्यपगत झालेले आहे.

पुणे महानगरपालिकेने अद्यापही आरक्षणाची मागणी केलेली नाही, त्यामुळे कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परळ (मुंबई) येथील वाडिया रुग्णालयाला आवश्यक निधी देण्याबाबत

**(२०) * ३६०१५ श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.दत्तात्रय सावंत, डॉ.सुधीर तांबे, श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय उर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळ (मुंबई) येथील वाडिया रुग्णालयात पायाभूत सुविधांकरिता शिशु अतिदक्षता विभागाला वेळेवर निधी उपलब्ध न झाल्याने दिनांक २१ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास सर्वाधिक बालमृत्यू झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही शिशू अतिदक्षता विभागांची आवश्यकता असतांनाही निधी नसल्याने सुरु करता येत नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वैद्यकीय शिक्षण संचालक यांनी या रुग्णालयाच्या सुविधेकरिता मा.पालकमंत्री, मुंबई यांचा निधी वापरण्यात येईल असे आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त रुग्णालयाला आवश्यक मंजूर निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील वन विभागातील रिक्त पदे असल्याबाबत

**(२१) * ३५४४५ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.आनंदराव पाटील, श्री.सुभाष झांबड, श्री.हरिसिंग राठोड, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.तानाजी सावंत :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वन विभागात २२०० पदे रिक्त असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यात भारतीय वन सेवेतील पाच, तसेच क्षेत्रिय वनाधिकाऱ्यांच्याही अनेक पदांचाही समावेश असून “मोबाईल स्कॉड” या अतिमहत्वाच्या पथकात देखील ५८ पदे रिक्त असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वन विभागाचे राज्यात प्रादेशिक (११ वनवृत्त) तर वन्यजीव विभागाचे (९ वनवृत्त) असतांना जंगल वन्यजीवांच्या संरक्षणाची जबाबदारी सांभाळणाऱ्या वनपाल, वनरक्षक आणि वन परिक्षेत्राधिकाऱ्यांची सुमारे ९७० पदे रिक्त असल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय, सप्टेंबर, २०१७ अखेर वन विभागात २२०१ पदे रिक्त आहेत.
(२) व (३) माहे सप्टेंबर, २०१७ अखेर वन विभागातील क्षेत्रिय कार्यालयातील भारतीय वन सेवा अधिकाऱ्यांची ९ पदे, महाराष्ट्र वन सेवेतील विभागीय वन अधिकारी-२४ पदे, सहा. वनसंरक्षक ६२ पदे रिक्त आहेत.

याव्यतिरिक्त वनक्षेत्रपाल १७६ पदे, वनपाल-४२८ पदे व वनरक्षक-४०२ पदे अशी एकूण १००६ पदे रिक्त आहेत. यापैकी मोबाईल स्कॉड पथकातील वनक्षेत्रपाल-१८ पदे, वनपाल-१६ पदे व वनरक्षक-१६ पदे अशी एकूण ५० रिक्त पदे आहेत.
(४) भारतीय वन सेवा अधिकाऱ्यांची रिक्त पदे उपलब्ध अधिकाऱ्यांमधून पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. पदोन्नतीमधील आरक्षणाबाबत विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्याने सामान्य प्रशासन विभागाने दिनांक २/११/२०१७ रोजीच्या पत्रान्वये सर्व स्तरावरील पदोन्नती प्रक्रिया स्थगित ठेवली आहे. सदर प्रकरणी होणाऱ्या निर्णयानुसार विभागीय वन अधिकारी संवर्गातील २४ पदे, सहा. वनसंरक्षक संवर्गातील ५१ पदे, वनपाल संवर्गातील ४२८ पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

सरळसेवेद्वारे सहा. वनसंरक्षक संवर्गातील ११ पदे फेब्रुवारी, २०१८ अखेर, तसेच वनक्षेत्रपालांची १९५ रिक्त पदे मार्च, २०१८ अखेर प्रशिक्षणाअंती उपलब्ध होणार आहेत.

वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक २/६/२०१५ व दिनांक १५/१/२०१६ मधील रिक्त पदे भरण्याच्या निर्बंधास अनुलक्षून क्षेत्रिय स्तरावरील सहा. वनसंरक्षक, वनक्षेत्रपाल, वनरक्षक, लेखापाल व लिपीक या संवर्गातील दरवर्षी रिक्त होणारी पदे पुढील ३ वर्षे १०० टक्के भरण्यास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव सामान्य प्रशासन/वित्त विभागास सादर करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्रातील खाजगी रुग्णालयांकडून होणारी रुग्णांची फसवणूक

**(२२) * ३५०५१ श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.दत्तात्रय सावंत : तारांकित प्रश्न क्रमांक ३२२५७ ला दिनांक २८ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील खाजगी रुग्णालयांकडून होणारी रुग्णांची फसवणूक थांबविण्यासाठी रुग्णालयांवर नियंत्रण आणणाऱ्या वैद्यकिय आस्थापना कायद्याचा मसुदा महाराष्ट्र क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट ॲक्ट शासनाने तयार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा कायदा मंजुरीबाबत शासनाकडून कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

महाराष्ट्र क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट ॲक्ट चा मसुदा शासनाने तयार केला आहे.

(२) कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्हा परिषद अंतर्गत बदलीपात्र शिक्षक व रिक्त पदांची यादी निर्धारित कालावधीत प्रकाशित न केल्याबाबत

**(२३) * ३५५४४ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्हा परिषदे अंतर्गत बदलीपात्र शिक्षक व रिक्त पदांची यादी निर्धारित कालावधीत प्रकाशित न करता संवर्ग १ व २ मधील शिक्षकांना बदली पोर्टलमध्ये अर्ज भरण्यापासून वंचित ठेवणाऱ्या तसेच कर्मचाऱ्यांना वाईट वागणूक देण्याऱ्या तत्कालिन प्रभारी शिक्षणाधिकारी श्री.मारोती चलाख यांचेवर निलंबनाची कारवाई करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक ११ ऑक्टोबर, २०१७ रोजी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

असे निवेदन विभागाकडे प्राप्त झाले असून ते चौकशीसाठी जिल्हा परिषद, गडचिरोली यांचेकडे पाठविण्यात आले आहे. मात्र तत्पूर्वीच लोकप्रतिनिधी यांची शिक्षण उपसंचालक, नागपूर यांच्याकडून जिल्हा परिषदेकडे तक्रार प्राप्त झाली होती.
(२) व (३) सदर प्रकरणी उपमुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी (निरंतर) यांची चौकशी समिती गठित करण्यात येऊन सदर समितीच्या अहवालानुसार श्री.एम.एन. चलाख, तत्कालिन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) हे दोषी आढळून येत नसल्याने त्यांचेविरुध्द कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्वच्छ भारत अभियान योजनेत गैरव्यवहार केल्याबाबत

**(२४) * ३५४१० श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्वच्छ भारत अभियान योजनेत केलेले आर्थिक गैरप्रकार, अनियमितता, वित्तिय मर्यादा डावलणे व इतर गैरप्रकारांची मुद्दे निहाय चौकशी करून त्यांना निलंबित करण्यात यावे अशी मागणी परभणी येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदनाव्दारे मुख्य सचिव यांच्याकडे सन २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्राप्त निवेदनातील मुद्यांच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्यास्तरावरुन प्राथमिक चौकशी करण्यात आलेली आहे. प्राथमिक चौकशी अहवालातील निष्कर्ष विचारात घेऊन तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी व इतर अधिकारी यांच्याकडून खुलासा मागविण्यात आलेला आहे. संबंधितांकडून खुलासा प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पैठण (जि.औरंगाबाद) तालुक्यात शाळांच्या इमारतींचे नुकसान झाल्याबाबत

**(२५) * ३५३०२ श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण (जि.औरंगाबाद) तालुक्यात दिनांक ५ व ६ जून, २०१६ रोजी झालेल्या वादळी पावसामुळे जिल्हा परिषदेच्या ९ शाळांच्या इमारतींचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शाळांची दुरुस्ती करण्याबाबतचा प्रस्ताव पंचायत समिती जिल्हा परिषद यांच्याकडे पाठविला आहे व जिल्हा परिषदेने या प्रस्तावाकडे दुर्लक्ष केल्यामुळे गेल्या दिड वर्षापासून विद्यार्थ्यांच्या जिवीतास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कारवाई करुन उक्त शाळांच्या दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

वादळी पावसामुळे पैठण तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ९ शाळांचे नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त जिल्हा परिषद शाळापैकी मौजे तांदुळवाडी ३ वर्ग खोल्यांची दुरुस्ती करणे व मौजे शिवणी येथे १ नवीन वर्ग खोली बांधकाम सर्व शिक्षा अभियानांतर्गत करणेस मंजूरी देण्यात आली आहे.

सन २०१६-१७ अखरे दायित्व रुपये २४६.७८ लक्ष मंजूर निधीपेक्षा जास्त असल्याने नवीन दुरुस्ती कामाना मान्यता देता आली नाही.

सन २०१७-१८ मध्ये जिल्हा नियोजन योजनांतर्गत मौजे शिवणी व पाटेगाव येथे प्रत्येकी १ नवीन वर्ग खोली बांधकामास प्रस्तावित करण्यात आले आहे. सर्व शिक्षा अभियानांतर्गत अनुक्रमे (१) अगर नादर १ वर्ग खोली,

(२) नायगव्हाण १ वर्ग खोली, (३) नारळा १ वर्ग खोली, (४) शिवणी १ वर्ग खोली, (५) सोलनापूर ३ वर्ग खोल्या मंजूर करण्यात आली आहे. उर्वरित दादेगाव व हर्षी (बु.) येथील जिल्हा परिषद शाळा दुरुस्तीच्या कामाचे नियोजन करण्यात येत आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील बलात्कार पिडीत व ॲसिड हल्ल्यात जखमी महिलांसाठी मनोधैर्य योजनेचे निकष बदलण्याबाबत

**(२६) * ३४८८९ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने सन २०१३ मध्ये राज्यातील बलात्कार पिडीत व ॲसिड हल्ल्यात जखमी महिलांसाठी मनोधैर्य योजना सुरु केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेच्या शासन निर्णयाधीन निकषात बदल करण्याबाबतचा शासन निर्णय शासनाने निर्गमित केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नव्याने निर्गमित केलेल्या सदर शासन निर्णयान्वये बदल करण्यात आलेले निकष हे अत्यंत जाचक व पिडीतास मदत न देण्याकडेच त्याचा कल असल्याच्या तक्रारी पीडीत व त्यांचे नातेवाईकांनी शासनाकडे करण्यात आल्या असल्याचेही दिनांक १३ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच या शासन निर्णयातील जाचक अटी व निकषांमध्ये सुधारणा करण्याबाबत शासनाने समिती नेमावी, असे मा.उच्च न्यायालयाने दिनांक १३ ऑक्टोबर, २०१७ रोजी शासनास आदेश दिले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने तसेच मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच त्याबाबत सद्य:स्थिती काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) होय.

(३) व (४) यासंदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र. २९५१/२०१६ मध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक ०८/०३/२०१७ रोजी दिलेल्या निर्देशानुसार मनोधैर्य योजनेच्या सन २०१३ च्या आर्थिक निकषामध्ये बदल करुन महिला व बालविकास विभागाने दिनांक ०१/०८/२०१७ रोजी सुधारित आदेश निर्गमित केले आहे. मनोधैर्य योजनेच्या नवीन निकषानुसार बलात्कार, बालकांवरील लैंगिक अत्याचार आणि ॲसिड हल्ल्यातील घटनांमधील पीडितांचे पुनर्वसन प्रभावीपणे होणार आहे.

तथापि, मनोधैर्य योजनेच्या नवीन निकषाबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. सदर जनहित याचिकेच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयांतर्गत समिती गठीत करण्यात आलेली आहे.

(५) सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

-----------------

## राज्यात बालमृत्यू आणि कुपोषित बालकांच्या कुटुंबियाना रोजगार हमीचे काम देण्याबाबत

**(२७) * ३५१६९ श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रात एप्रिल, २०१७ या एका महिन्यात १०३६ बालमृत्यू आणि ६,३३,४०१ कुपोषित बालकांच्या कुटुंबियांना रोजगार हमीचे काम द्यावे असे निवेदन दिनांक २२ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्र्यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनातील मागण्यांचे स्वरुप काय आहे,

(३) तसेच याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) हे खरे आहे.

(२) अकाली मृत्यू पावलेल्या आणि कुपोषित बालकांच्या कुटुंबाना त्यांच्या घराजवळ रोजगार हमीचे काम देण्यात आल्यास कुपोषणाची तीव्रता कमी होईल. आदिवासी आणि ग्रामीण भागातील कुपोषित बालकांच्या राहण्याच्या ठिकाणाजवळ वन जमिनीत आणि इतर जमिनीत गवत कापण्याचे काम रोजगार हमीतून दिल्यास रोजगार उपलब्ध होऊन गवत कापल्यामुळे वनव्याचे प्रमाण कमी होईल, तसेच गुरे आणि शेळया जागेवर बांधून ठेवून त्यांना खाद्य देता येईल, त्याचप्रमाणे मोकळया गुरांमुळे आणि शेळयामुळे होणारे शेतीचे आणि झाडाचेही नुकसान थांबेल असे मागण्यांचे स्वरुप आहे.

(३) मग्रारोहयो अंतर्गत अशा कुटुंबाना रोजगार हमीची कामे तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कुडूस (ता.वाडा, जि.पालघर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात तज्ञ वैद्‌यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत

**(२८) * ३५६६४ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडूस (ता.वाडा, जि.पालघर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्र तज्ञ वैद्‌यकीय अधिकाऱ्यांविना सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमबीबीएस व बीएएमएस अशा दोन वैद्‌यकीय अधिकाऱ्यांच्या जागाही गेल्या वर्षभरापासून रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित अधिकाऱ्यांच्या नियुक्तीबाबत तालुका व जिल्हा परिषद अधिकाऱ्यांकडे निवेदन दिले असून याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) अशंत: खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र कुडूस येथे तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्याचे पद मंजूर नाही. तथापि, प्राथमिक आरोग्य केंद्र, निंबवली, ता.वाडा येथील वैद्यकीय अधिकारी गट-ब प्राथमिक आरोग्य केंद्र कूडूस येथील कामकाज दिनांक १८/०७/२०१६ पासून पाहत आहेत.

(३) हे खरे नाही.

वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्तीबाबत जिल्हा परिषद अधिकाऱ्यांकडे कोणतेही निवेदन प्राप्त झाले नाही. तथापि नियमित वैद्यकीय अधिकारी भरण्याची कार्यवाही सरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विक्रमगड (जि.पालघर) नगरपंचायतीमधील यशवंतनगर व वाकुपाडा गावांची स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेबाबत

**(२९) * ३५३३५ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले** : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड (जि.पालघर) नगरपंचायतीमधील यशवंतनगर व वाकुडपाडा महसूली गावांची स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेबाबत सन २००६ म्ध्ये तेथील सुमारे २ हजार ग्रामस्थांच्या स्वाक्षरीने ग्रामसभेत ठराव मंजूर झाल्याबाबत श्रमजीवी कामगार रयत संघटनेने मा.मुख्यमंत्री, मा.ग्रामविकास मंत्री, सचिव, ग्रामविकास विभाग व जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे ग्रामपंचायत मंजूर करण्याची मागणी दिनांक १४ ऑगस्ट, २०१७ रोजी त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्यानुषंगाने उक्त भागात स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

मा.श्री.विवेक पंडित, संस्थापक अध्यक्ष, श्रमजीवी कामगार रयत संघटना यांनी दिनांक ११/८/२०१७ रोजीच्या पत्रान्वये मा.मुख्यमंत्री महोदयांकडे पालघर जिल्हयातील विक्रमगड नगरपंचायती मधील यशवंतनगर व वाकुडपाडा या गावांची स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेबाबतचे निवेदन सादर केले आहे.

(२) सद्य:स्थितीत विक्रमगड ग्रामपंचायतीचे यशवंतनगर व वाकुडपाडा या गावासह संपूर्ण क्षेत्राचे नगरपंचायतीमध्ये रुपांतर करण्यात आले आहे. याबाबत शासन राजपत्र दिनांक ७ मे, २०१६ अन्वये प्रसिध्द करण्यात आले आहे.

विक्रमगड नगरपंचायतीमधील यशवंतनगर व वाकुडपाडा या गावांमध्ये ग्रामपंचायत स्थापन करावयाची झाल्यास या गावांना विक्रमगड नगरपंचायतीमधून वगळणे आवश्यक आहे. नगरपंचायती मधून गावे वगळणेबाबतची कार्यवाही नगर विकास विभागाकडून होणे आवश्यक असल्याने सदरचा संदर्भ आवश्यक त्या कार्यवाहीसाठी दिनांक ११ ऑक्टोबर, २०१७ रोजीच्या शासनपत्रान्वये नगर विकास विभागाकडे पाठविण्यात आला आहे. त्याची प्रत संबंधितांना देण्यात आली आहे.

तसेच यासंदर्भात प्राप्त अन्य निवेदनांच्या अनुषंगानेही शासनपत्र दिनांक ८ जुलै, २०१६, दिनांक १९ सप्टेंबर, २०१६, दिनांक २५ ऑक्टोबर, २०१६, व दिनांक २२ डिसेंबर, २०१६ अन्वये नगर विकास विभागाकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यातील शेतकरी किटकनाशकाच्या फवारणीमुळे विषबाधित झाल्याबाबत

**(३०) * ३४८९६ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये किटकनाशकाच्या फवारणीमुळे जे शेतकरी विषबाधित झाले त्यांना जिल्हा रुग्णालयात दाखल केल्यानंतर औषधांची टंचाई निर्माण झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालयात अत्यावश्यक औषधे नसल्याने डॉक्टरांनी रुग्णास बाहेरुन औषधे आणण्यास सांगितल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, चौकशीअंती संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) जुलै, २०१७ ते नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत किटकनाशक फवारणीमुळे विषबाधित झालेल्या ५०१ रुग्णांवर उपचार करण्यात आले असून एक रुग्ण वगळता अन्य सर्व रुग्णांना रुग्णालयामधून औषधे पुरविण्यात आली आहेत. औषध पुरवठ्यामध्ये तफावत असल्यामुळे फक्त एका रुग्णाला बाहेरून इंजेक्शन पाम हे औषध लिहून देण्यात आले होते.

(३) सदर प्रकरणी संस्थास्तरावर त्रिसदस्यीय समिती स्थापन केली होती. सदर समितीच्या अहवालानुसार सदर रुग्णाला जाणीवपूर्वक बाहेरुन औषध लिहून दिलेली नाही. आकस्मिक उद्भवलेल्या परिस्थितीमुळे एका रुग्णाला बाहेरुन औषध लिहून दिलेले आहे. त्यामुळे संबधितांवर कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सौंदड (ता.सडकअर्जुनी, जि.गोंदिया) येथे युवकाचा डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू झाल्याबाबत

**(३१) * ३५९१० श्री.परिणय फुके** : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सौंदड (ता.सडकअर्जुनी, जि.गोंदिया) येथे दिनांक २२ सप्टेंबर, २०१७ रोजी २३ वर्षीय युवकाचा डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू झाल्याने खोडशिवणी प्राथमिक आरोग्य केंद्रासमोर गावकऱ्यांनी आंदोलन करुन डॉक्टरांवर कारवाई होत नाही तोपर्यंत आरोग्य केंद्र बंद ठेवण्यात येईल अशी भूमिका घेतली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत** : (१) हे अंशत: खरे आहे.

दिनांक २२/०९/२०१७ रोजी २३ वर्षीय युवकाचा मृत्यू झाल्यामुळे खोडशिवणी प्रा.आ. केंद्रासमोर गावकऱ्यांनी आंदोलन केले परंतु मृत्यू डॉक्टराच्या हलगर्जीपणामुळे झाल्याचे प्राथमिक चौकशीत आढळून आले नाही.

(२) प्राथमिक आरोग्य केंद्र, खोड शिवणी येथे दिनांक २२/९/२०१७ रोजी सर्पदंश झाल्याने सौंदड येथील युवकास उपचारार्थ बेशुध्द अवस्थेत गंभीर स्थितीत दुपारी १२.३० वाजता आणण्यात आले असता रुग्णावर तात्काळ प्रथमोपचार करुन पुढील आवश्यक त्या उपचारार्थ के.टी.एस. सामान्य रुग्णालय, गोंदिया १२.४५ वाजता संदर्भित करण्यात आले.

प्रस्तुत प्रकरणी प्राथमिक चौकशी करण्यात आली असून चौकशीमध्ये वैद्यकीय अधिकारी दोषी आढळून आले नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी संग्रहालय (नागपूर) प्रकल्पाच्या प्रलंबित कामाबाबत

**(३२) * ३५९८७ श्री.प्रकाश गजभिये : तारांकित प्रश्न क्रमांक २८६३४ ला दिनांक १६ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी संग्रहालय (नागपूर) प्रकल्पाचे काम करण्यासाठी फॉरेस्ट डेव्हलेपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र व खाजगी निवेशक यांची स्पेशल पर्पज व्हेईकलची स्थापना केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच गोरेवाडा प्राणी संग्रहालयास वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या अंतर्गत केंद्र शासनाची परवानगी मिळाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राणी संग्रहालयातील अफ्रिकन सफारीच्या कामांची अंदाजपत्रके बनवण्याची कामे पूर्ण झाली आहेत काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी संग्रहालय प्रकल्पाचे काम पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

गोरेवाडा प्राणी संग्रहालयाची कामे करण्यासाठी एफ.डी.सी.एम.लि. व खाजगी निवेशक यांची स्पेशल पर्पज व्हेईकलची स्थापना करण्याकरिता वेळोवेळी जाहिरात देण्यात आली आहे. तथापि योग्य तो प्रतिसाद न मिळाल्याने पुनश्च: जाहिरात दिनांक १५/११/२०१७ रोजी देण्यात आली आहे.

(२) हे खरे आहे.

वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या कलम २ अंतर्गत पर्यावरण, वन व वातावरण बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी गोरेवाडा प्राणी संग्रहालयाकरिता ५६४.०० हेक्टर वन जमिनीचे वळतीकरणास मान्यता प्रदान केली आहे.

(३) प्राणी संग्रहालयातील अफ्रिकन सफारीच्या कामांची अंदाजपत्रके बनवण्याची कामे पूर्ण झालेली नाहीत.

(४) अफ्रिकन सफारीची कामे खाजगी निवेशकामार्फत करण्यात येणार आहेत. गोरेवाडा प्राणी संग्रहालयाची कामे करण्यासाठी एफ.डी.सी.एम.ली. व खाजगी निवेशक यांची स्पेशल पर्पज व्हेईकलची स्थापना करण्याकरिता वेळोवेळी जाहिरात देण्यात आली असून योग्य तो प्रतिसाद न मिळाल्याने पुनश्च: जाहिरात दिनांक १५/११/२०१७ रोजी देण्यात आली आहे.

गोरेवाडा प्राणी संग्रहालयाचा संकल्प आराखडा, बचाव केंद्र व मास्टर प्लॅनला केंद्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी मान्यता प्रदान केली असून गोरेवाडा येथे बचाव केंद्र स्थापित करण्यात आले आहे. गोरेवाडा प्राणीसंग्रहालयाच्या सभोवताली व प्रकल्पाच्या क्षेत्रातून जाणाऱ्या महामार्गाच्या दोन्ही बाजूंनी संरक्षण भिंत बांधण्यात आली आहे. गोरेवाडा प्रकल्पामध्ये इंडियन सफारी व इतर अनुषंगिक कामाकरिता ई-निविदेव्दारे निश्चित करण्यात आलेल्या कंपनीला कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. तसेच सदर प्रकल्पातील जलाशयाचे कामांना प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाली असून जलाशयाची कामे नागपूर पाटबंधारे विभाग यांचेमार्फत करण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उपजिल्हा रुग्णालय, श्रीवर्धन (जि.रायगड) येथील महिला कर्मचाऱ्यांना वेतन देण्याबाबत

**(३३) * ३५८२५ श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उपजिल्हा रुग्णालय, श्रीवर्धन (जि.रायगड) येथील करार पध्दतीवर कार्यरत असलेल्या महिला कर्मचाऱ्यांना मागील सात महिन्यापासून वेतन मिळाले नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महिला कर्मचाऱ्यांना वेतन न मिळण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महिला कर्मचाऱ्यांना वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) उपजिल्हा रुग्णालय, रायगड येथील सेवा पुरवठादार संस्था यांनी मार्च, २०१७ ते जून, २०१७ या कालावधीतील देयके ऑक्टोबर, २०१७ मध्ये सादर केली असून कोषागाराने पारित केली आहेत. सदर रक्कम सेवा पुरवठादारास अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) ठेकेदाराने देयके विलंबाने (ऑक्टोबर, २०१७) मध्ये सादर केल्यामुळे विलंब झाला आहे.

-----------------

## चिता कॅम्प (ट्रॉम्बे, मुंबई) परिसरातील अनधिकृत झोपडया हटविण्याबाबत

**(३४) * ३५५६० ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ट्रॉम्बे (मुंबई) येथील चिता कॅम्प परिसरातील खाडीमध्ये भूमाफियांनी मोठया प्रमाणावर अनधिकृत झोपडया बांधल्या असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी वा चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार उक्त अनधिकृत झोपडया हटविण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) हे खरे नाही. तथापि, मौजे तुर्भे स.क्र. १५२ न.भू.क्र. १० मधील अधिसूचित राखीव वनावरील कांदळवन वृक्षाची कत्तल करुन दिनांक १३/१०/२०१७ रोजी बांबू, वासे, पत्रे यांच्या सहाय्याने श्री.नसीम शेख या इसमाने १२ चौ.मी. क्षेत्रात शेडचे बांधकाम केल्याचे निदर्शनास आले. संबंधितांविरुध्द भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम २६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरचे बांधकाम दिनांक २३/१०/२०१७ रोजी निष्कासित करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मंग्याळ (ता.मुखेड, जि.नांदेड) येथे पाणी टंचाई निर्माण झाल्याबाबत

**(३५) * ३५५९१ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंग्याळ (ता.मुखेड, जि.नांदेड) येथे जलयुक्त शिवार अभियानांतर्गत बांधलेल्या बंधाऱ्याला उद्‌घाटना पूर्वीच गळती लागल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बंधाऱ्यात साठवलेले पाणी दोन ते तीन महिन्यांच्या कालावधीत वाहून जात असल्यामुळे पाणी टंचाई निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही.

तथापि, दिनांक १७/०९/२०१७ रोजी दैनिक लोकमत वृत्तपत्रात यासंदर्भात बातमी प्रसिध्द झाली होती.

(२) हे खरे नाही.

(३) दैनिक लोकमत वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने उपविभागीय अभियंता, मुखेड व कार्यकारी अभियंता लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, नांदेड यांनी सदर कामाची तपासणी केली असून बंधारे सुस्थितीत असल्याचे आढळून आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हा परिषदेच्या लघुसिंचन विभागातील शाखा अभियंत्याचे पद भरण्याबाबत

**(३६) * ३५७१४ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हापरिषदेच्या लघुसिंचन विभागातील शाखा अभियंत्याविरुध्द भ्रष्टाचाराचा गुन्हा दाखल असतांनाही उपविभागीय अधिकारी रामटेक यांनी जिल्हा सर्कल मनसर, कांद्री व भंडारबोडी येथील कामांची जबाबदारी त्यांना दिल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भ्रष्टाचाराचे गुन्हे दाखल असलेल्या अभियंत्याला सेवेत पुन:स्थापित करुन त्याच्यावर कार्यालयीन जबाबदारी देण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशाचे पालन न करता विभागीय आयुक्तांनी दोषी अभियंत्याला महत्वाच्या पदावर नियुक्त केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भ्रष्टाचाराचे गुन्हे दाखल असलेल्या अभियंत्याची तातडीने बदली करुन अन्य जबाबदार अधिकाऱ्याची उक्त पदावर नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) होय, अंशत: खरे आहे.

(३) व (४) हे खरे आहे. तथापि, त्यानंतर दिनांक २९/११/२०१७ रोजी त्यांचे पदस्थापनेबाबत सुधारीत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वैद्यकिय महाविद्यालय (नागपूर) येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या वेतनाबाबत

**(३७) * ३५३६० श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर वैद्यकिय महाविद्यालयातील वैद्यकिय अधिकारी (निवासी डॉक्टर) यांना मागील ५ महिन्यांपासून वेतन मिळाले नसल्याचे दिनांक ५ सप्टेंबर, २०१७ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर कार्यरत डॉक्टरांचे वेतन देण्यासबंधी शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशतः खरे आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय तथा अनुसंधान केंद्र नागपूर येथील सार्वजनिक आरोग्य विभागातील अधिकारी यांचे प्रादेशिक मनोरुग्णालय येथे सेवा संलग्न करण्यात आल्या असून त्यांचे वेतन अप्राप्त आहे.
(२) सार्वजनिक आरोग्य विभागातील संबंधीत दोन वैद्यकीय अधिकारी यांचे वेतन देयके टोकन क्र. ७०३११/ दिनांक १२/१२/२०१७ अन्वये ५ महिन्याचे देयके तयार करुन कोषागारास सादर केले असून देयक पारित होतास संबंधितास वेतन अदा करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार अभियानाला आर्थिक मदत देण्याबाबत

**(३८) * ३५५१६ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार अभियानाला गती देताना लोकसहभागातून केल्या जाणाऱ्या खोदाईच्या कामासाठी यंत्रसामुग्री देणाऱ्या गावांना इंधनाच्या खर्चापोटी शासन आर्थिक मदत देणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जलयुक्त शिवार अभियानात समावेश असलेल्या गावांसाठीच ही मदत देण्याची अट आदेशात असल्यामुळे इच्छा असूनही गाळ काढण्याची कामे करता येत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय.
(२) व (३) नाही. तथापि, शासन निर्णय दिनांक ६ मे, २०१७ च्या अन्वये राज्यात गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार ही योजना राबविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर योजना राज्यातील २५० हे. पेक्षा कमी सिंचन क्षमता असणाऱ्या सर्व धरणांकरीता लागू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लाखपुरी (ता.मुर्तिजापूर, जि.अकोला) येथील लक्षेश्वर रामायणकालीन मंदिरास धार्मिक पर्यटन स्थळांचा दर्जा देण्याबाबत

**(३९) * ३५६१० श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मूर्तिजापूर (जि.अकोला) येथील पयोष्णी (पूर्णा) नदीच्या तीरावर लाखपुरी गावात लक्षेश्वर भगवानचे रामायणकालीन मंदिर असून सदर परिसर १९९८-९९ मध्ये शासनाने "क" वर्ग धार्मिक पर्यटन स्थळ म्हणून मंजूर केले असून सदर पर्यटन स्थळास रुपये १ कोटी निधी मंजूर करुन भूमिपूजनसुध्दा करण्यात आले आहे, हे, खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पर्यटन स्थळाच्या दर्शनासाठी दरवर्षी पाच लाख भाविक व इतर मंडळे येत असून संस्थान परिसरात पिण्याकरिता मुबलक पाणी नसणे, नदीवर घाट बांधलेला नसणे, नदीवर जाण्याकरिता मार्ग नसणे, बागबगीचा नसणे, व्यापारी संकुल नसणे, लाईटची व्यवस्था नसणे व बोटींग व्यवस्था नसणे आदि सोयी-सुविधांचा अभाव असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, अंशत: खरे आहे.

लक्षेश्वर संस्थान, लाखपूरी, ता.मूर्तिजापूर या तीर्थक्षेत्रास जिल्हा नियोजन समितीच्या दिनांक २४/१२/१९९६ च्या सभेमध्ये “क” वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा देण्यात आला आहे.
(२) व (३) लक्षेश्वर संस्थान, लाखपूरी, ता.मूर्तिजापूर या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत सन २००६-०७ मध्ये स्वच्छतागृह, पाण्याची टाकी, छोटीसी बाग तयार करण्यासाठी रुपये ४.०४ लक्ष निधी तसेच सन २००८-०९ मध्ये संरक्षण भिंत बांधकामाकरीता रुपये १०.०० लक्ष निधी खर्च करण्यात आला आहे. तसेच सदर तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी विकास कामांसाठी केलेल्या रुपये १.०० कोटी निधीच्या मागणीनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तांत्रिक मान्यता प्रदान केलेल्या अंदाजपत्रकासह अहवाल जिल्हाधिकारी, अकोला यांनी मागविलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: जुन्नर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४०) * ३५७०२ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुन्नर (जि.पुणे) येथील पश्चिम आदिवासी दुर्गम भागात जानेवारी, २०१६ ते जून, २०१७ या दीड वर्षाच्या कालखंडात १ हजार ३५४ सर्पदंशाच्या घटना घडल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जुन्नर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात सर्पदंश, विंचूदंश, श्वानदंश इत्यादींवरील लसी व कृत्रिम श्वासोच्छवास याची सुविधा उपलब्ध नसल्याने रुग्णांना मृत्यूचा सामना करावा लागत असून परिस्थिती नसतानाही खासगी दवाखान्याचा आधार घ्यावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील दुर्गम आदिवासी भागात शासनाने सर्व प्राथमिक आरोग्य केंद्राचा आढावा घेवून तेथे आवश्यक लसींचा-औषधांचा पुरवठा, निवासी डॉक्टरांची नेमणूक, १०८ क्रमांकाची रुग्णवाहिका यांची सोय उपलब्ध करुन देण्याबाबत शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे. जानेवारी, २०१६ ते जून, २०१७ या कालावधीत जुन्नर (जि.पुणे) येथील पश्चिम आदिवासी दुर्गम भागात १०६ सर्पदंशांच्या घटना घडलेल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

प्राथमिक आरोग्य उपकेंद्रामध्ये सर्पदंश, विंचुदंश व श्वानदंशाच्या लसी यांची साठवणूक करण्यात येत नाही परंतु सर्पदंशाचे प्रमाण लक्षात घेऊन सदर विचूंदंश व श्वानदंशाच्या लसी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये उपलब्ध करुन देण्यात आल्या असून तेथील वैद्‌यकीय अधिकाऱ्यांकडून याबाबत उपचार केले जातात. जानेवारी, २०१६ जे जून, २०१७ या कालावधीत

सर्पदंशांच्या २६७ व श्वानदंशांच्या ७८० व्हायल्स उपलब्ध होत्या त्यापैकी अनुक्रमे १३९ व ७३४ वापरण्यात आल्या. १२८ सर्पदंशाच्या व ४६ श्वानदंशाच्या व्हायल्स शिल्लक आहेत.

वरील कालावधीत सर्पदंशाच्या १०६ रुग्णांवर, विंचूदंशांच्या ७८ रुग्णांवर व श्वानदंशांच्या ७८७ रुग्णांवर मोफत उपचार करण्यात आलेले आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्रात कृत्रिम श्वासोच्छवासाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येते. या ठिकाणी उपचारार्थ आलेल्या रुग्णांपैकी ८४ रुग्णांना पुढील उपचाराकरिता संदर्भसेवा देण्यात आलेली आहे. सदर तिन्ही प्रकारच्या रुग्णांपैकी एकही रुग्णांचा मृत्यू झाल्याची नोंद नाही. त्यामुळे रुग्णांना खाजगी दवाखान्यात उपचार घेण्याची बाब उद्‌भवली नाही.

(३) राज्यातील दुर्गम आदिवासी भागात प्राथमिक आरोग्य केंद्रात आवश्यक ती औषधे व लसीचा पुरवठा १०८ किंवा १०२ क्रमांकाची रुग्णवाहिका उपलब्ध करण्याची कार्यवाही करण्यात आली असून वैद्यकीय अधिकाऱ्यांची भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ताकारी-म्हैसाळ व टेंभू योजनेबाबत

**(४१) * ३६०३५ श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ताकारी-म्हैसाळ योजनेसाठी प्रधानमंत्री सिंचन योजनेतून किती निधी मंजुर झाला असून शासनाकडे किती निधी प्राप्त झाला आहे तसेच ताकारी-म्हैसाळ योजनेची उर्वरीत कामे कालबध्द मुदतीत पुर्ण करण्याचा आराखडा तयार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ताकारी-म्हैसाळ योजनेची लाभक्षेत्र विकासाचा आराखडा तयार करुन कामे केव्हा सुरू केली जाणार आहेत तसेच ताकारी-म्हैसाळ योजनेकरीता अपारंपारीक ऊर्जा स्त्रोताद्वारे वीज पुरवठा करण्याचे धोरण आखण्यात आले आहे काय, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, ताकारी-म्हैसाळ योजनेच्या पाणीपट्टीमधील महाराष्ट्र जलसंपत्ती प्राधिकरणाच्या प्रस्तावानुसार ८१ % वीज देयक शासन भरणार व १९% वीज बील शेतकरी भरणार अशाप्रकारे नविन धोरण तयार करण्यात आले आहे काय, उक्त धोरणाची अंमलबजावणी केव्हापासून होणार आहे,
(४) तसेच टेंभू उपसा सिंचन योजनेच्या सुधारीत प्रशासकीय अहवालास मान्यता अद्याप मिळालेली नसून सुधारीत प्रशासकीय मान्यतेकरीता आवश्यक प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे, तसेच टेंभू उपसा सिंचन योजनेकरीता सौरऊर्जा वापरून वीज पुरवठा करण्याकरीता धोरण तयार करण्यात आले असून सौरऊर्जा प्रकल्प उभारण्याकरीता किती निधी आवश्यक आहे व सदर धोरणाबाबत टेंभू उपसा सिंचन योजनेच्या सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावामध्ये तरतुद करण्यात आली आहे काय, सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी किती कालावधी लागणार असून सुधारीत प्रशासकीय अहवालानुसार अद्याप किती निधी उर्वरीत कामासाठी लागणार आहे,
(५) तसेच टेंभू उपसा सिंचन योजनेची उर्वरीत कामे कालबध्द मुदतीत पुर्ण करण्याबाबत आराखडा तयार करण्यात आला आहे काय, उर्वरीत कामे पुर्ण करण्याकरीता किती कालावधी लागणार आहे, तसेच टेंभू उपसा सिंचन योजनेचा प्रधानमंत्री सिंचन योजनेमध्ये समावेश करण्याकरीता प्रस्ताव तयार करण्यात आला आहे काय, सदर प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे,
(६) तसेच आरफळ योजनेची लाभक्षेत्र विकासाची कामे पुर्ण झाली आहेत काय, अपूर्ण लाभक्षेत्र विकासाची कामे पूर्ण करण्यासाठी किती निधी लागणार आहे व सदर कामे पूर्ण करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम तयार करण्यात आला आहे काय ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) होय.

AIBP/PMKSY अद्ययावत मंजूर किंमत रुपये २७७४.९० कोटी इतकी आहे. AIBP अंतर्गत मार्च २०१६ अखेर प्राप्त निधी व झालेला खर्च रुपये ६८३.८४ कोटी इतका आहे. ताकारी-म्हैसाळ योजनेसाठी प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेतून सन २०१६-१७ मध्ये माहे मार्च, २०१७ अखेरपर्यंत केंद्र शासन रुपये २३.०९ कोटी व राज्य शासन रुपये ५६.९१ कोटी असा एकूण रुपये ८० कोटी इतका निधी प्राप्त झाला आहे.

सन २०१७-१८ मध्ये रुपये २५० कोटी इतका निधी मंजूर आहे. या योजनेचे काम प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना (PMKSY) अंतर्गत माहे डिसेंबर, २०१९ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(२) योजनेचे लाभक्षेत्र विकास कामांतर्गत (CADWM) लाभक्षेत्र विकास कामांचा आराखडा/प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असून पुरेसा निधी उपलब्ध झाल्यानंतर माहे २०२० अखेरपर्यंत ५२८२४ हे. क्षेत्रावरील लाभक्षेत्र विकासाची कामे करण्याचे नियोजन आहे.

सद्य:स्थितीत ताकारी-म्हैसाळ योजनेकरीता अपारंपारीक ऊर्जास्त्रोताव्दारे वीज पुरवठा करण्याचे धोरण आखण्यात आलेले नाही.

(३) अद्याप याबाबत अंतिमत: निर्णय झालेला नाही.

(४) टेंभू उपसा सिंचन प्रकल्पाचा व्दितीय सुधारित प्रशासकीय अहवाल राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, पुणे यांच्याकडे छाननीत आहे.

टेंभू उपसा सिंचन योजनेकरिता सौर ऊर्जेव्दारा विजनिर्मिती BOOT (बांधा, मालकी, प्रचलन व हस्तांतर) तत्वानुसार उभारणी करण्याचे नियोजन महाजनकोच्या माध्यमातून करण्याचे प्रस्तावित आहे.

सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्तावित अहवालानुसार टेंभू प्रकल्पाची १ एप्रिल, २०१७ रोजीची उर्वरित किंमत रुपये १८३४.५९ कोटी इतकी आहे.

(५) टेंभू उपसा सिंचन प्रकल्पास दरवर्षी पुरेसा निधी उपलब्ध झाल्यास योजनेचे काम जून, २०२० पर्यंत पूर्ण करणेचे नियोजन आहे. टेंभू उपसा सिंचन योजनेचा समावेश केंद्र शासनाच्या अवर्षण प्रवण भागासाठीच्या विशेष तरतूदीसाठीची कार्यवाही प्रगतीत आहे.

(६) आरफळ योजनेची सांगली जिल्हयातील लाभक्षेत्र विकासाची सर्व कामे पुर्ण झालेली आहेत.

-----------------

## राज्यातील सिंचन प्रकल्प पुर्ण करण्याबाबत

**(४२) * ३६०५५ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अनेक सिंचन प्रकल्प अपूर्णावस्थेत असून नदी जोड प्रकल्पांतर्गत २४ हजार कोटी रुपयांचे चार प्रकल्प मार्गी लावण्यासाठी मा.मुख्यमंत्री व मा.केंद्रीय जलसंपदा मंत्री यांच्या उपस्थितीत मा.मुख्यमंत्री यांच्या वर्षा या निवासस्थानी दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास आढावा बैठक घेण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील किती प्रकल्प अपूर्णावस्थेत आहेत व त्यासाठी किती निधीची आवश्यकता आहे, तसेच राज्यात राबवावयाच्या नदी जोड प्रकल्पाचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, याबाबत कोणते निर्णय घेण्यात आले व निधीची उपलब्धता कशाप्रकारे करण्यात येणार आहे ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे. महाराष्ट्रातील प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेतील प्रकल्पांचा आढावा घेण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली, मा.केंद्रीय जलसंसाधन मंत्री, नवी दिल्ली व मा.जलसंपदा मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या उपस्थितीत दिनांक ०८ सप्टेंबर, २०१७ रोजी झालेल्या बैठकीत आंतरराज्य नदी जोड प्रकल्पांबाबत देखील चर्चा झाली.
(२) राज्यातील ३५९ बांधकामाधीन प्रकल्प आहेत. त्यांच्यासाठी दिनांक १ एप्रिल, २०१७ च्या उर्वरित किंमतीनुसार रुपये ९४,४६३ कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे. या शिवाय पार-तापी नर्मदा, नार-पार-गिरणा, पार-गोदावरी, दमनगंगा पिंजाळ इ. नदी जोड प्रकल्प हाती घेणे प्रस्तावित आहे. या प्रकल्पांमुळे सुमारे १६०० दलघमी पाणीसाठा होऊन राज्यातील सुमारे १ लाख हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे. सदर नदी जोड प्रकल्पांचे सर्व्हेक्षणाचे काम चालू आहे.

(३) राष्ट्रीय जलविकास अभिकरणाद्वारे महाराष्ट्र राज्यातील राज्यस्तरीय नदी जोड योजनांचा पूर्व संभाव्यता अभ्यास, व्यवहार्यता तपासणी अभ्यास करण्यात येत आहे. तसेच नदी जोड प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. उपरोक्त नदी जोड प्रकल्पांसाठी आवश्यक निधीपैकी ९०% निधी केंद्र शासनाकडून प्राप्त होणे अपेक्षित आहे. उर्वरित निधी राज्य शासनाच्या अर्थसंकल्पातून उपलब्ध करणेत येणार आहेत.

-----------------

## वडाळी (जि.अमरावती) येथील बांबू उद्यानाचे विकास कामांमध्ये अपहार झाल्याबाबत

**(४३) * ३६५७२ श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडाळी (जि.अमरावती) येथील बांबू उद्यानाचे विकास कामामध्ये शासकीय धोरणाचे उल्लंघन करुन शासकीय निधीचा अपहार केल्यासंदर्भात अमरावती येथील नागरिक श्री.दिलीप कापसीकर यांनी मा.वने मंत्री, वन सचिव, प्रधान मुख्य वन संरक्षक (वन बल प्रमुख) नागपूर व मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) अमरावती यांना तक्रारी प्रणालीचा वापर न करता दिनांक १९ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास तक्रार दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन विभागातील उच्च पदाधिकाऱ्यांशी संगनमत करुन विकास कामाच्या शासकीय निधीचा अपहार केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित अधिकारी व त्यांचे नियंत्रण अधिकारी यांचेवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय, अशा स्वरुपाची तक्रार दिनांक १० ऑगस्ट, २०१७ रोजी प्राप्त झाली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शासनाने शासकीय कामकाजात “पेमांडू” युनिट स्विकारण्याबाबत

**(४४) * ३६८१९ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलेशिया सरकारने शासकीय कामकाजात वेगाने परिवर्तन घडवून आणण्यासाठी व वैशिष्ट्यपूर्ण काम करण्यासाठी स्थापन केलेले “पेमांडू” नावाचे युनिट राज्य शासनाने शालेय शिक्षण व क्रीडा, सार्वजनिक आरोग्य, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या कामकाजात स्विकारले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर “पेमांडू” कार्यपध्दतीचे स्वरुप व त्याच्या अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय.

(२) व (३) मलेशिया सरकारच्या पेमांडू या संस्थेच्या ‘Big Fast Result (BFR)’ या कार्यप्रणालीमध्ये एकूण ८ रचना परिमाणे (Modules) आहेत. यापैकी ‘कार्यशाळा’ (Lab) व ‘देखरेख व अंमलबजावणी’ (Monitoring & Implementation) या दोन रचनापरिमाणासंबधात कार्यवाहीकरिता शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग आणि पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग या तीन विभागांमधील एकेका क्षेत्राची निवड करण्यात आली आहे. ‘कार्यशाळा’ (Lab) या रचनापरिणामामध्ये निवडलेल्या क्षेत्राशी संबंधित अडी-अडचणी व आव्हाने याबाबत संबंधित ‘विविध घटके’ (Stake holders) यांच्या मध्ये समन्वय व चर्चा घडवून आणली जाते. ‘कार्यशाळा’ (Lab) रचनापरिमाणामध्ये प्राप्त झालेल्या शिफारशींवर विचारविनिमय करून अंतिम निष्कर्ष काढले जातात व त्याआधारे ‘अंमलबजावणीचा कृती आराखडा’ (३ ft. Plan) तयार करण्यात येतो. या ‘अमंलबजावणी कृती आराखड्याची’ (३ ft Plan) अंमलबजावणी ‘देखरेख व अंमलबजावणी’ (Monitoring & Implementation) या रचनापरिमाणामध्ये करण्यात येते. मलेशिया सरकारच्या ‘पेमांडू’ या संस्थेच्या नावामध्ये झालेल्या बदलाच्या अनुषंगाने निती आयोगाकडून अधिक माहिती प्राप्त करून घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## दारिद्रय रेषेखालील (बीपीएल) कुटूंबातील व्यक्तीला उपचारासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४५) * ३६८५६ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.रामहरी रुपनवर, श्री.हरिसिंग राठोड, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाकडून (अ) राष्ट्रीय आरोग्य निधी, (ब) राज्य आरोग्य सहाय्यता निधी, (क) आरोग्य मंत्री विविकाधीन अनुदान योजना व (ड) आरोग्य मंत्री कॅन्सर रोगी निधी अशा चार योजनांच्या माध्यमातून दारिद्रय रेषेखालील (बीपीएल) कुटूंबातील व्यक्तीला उपचारासाठी निधी उपलब्ध करुन दिला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने एकाही योजनांतून निधी मिळविण्याचा प्रयत्न केला नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त एकाही योजनेतून सन २०१७-१८ मध्ये, राज्यातील रुग्णांसाठी दिनांक ५ नोव्हेंबर, २०१६ अखेर निधी मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने राज्यातील रुग्णांना केंद्र शासनाच्या आरोग्य योजनेपासून वंचित ठेवणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर योजना ह्या चार नसून त्या तीन आहेत. राष्ट्रीय आरोग्य निधी व राज्य आरोग्य सहाय्यता ह्या दोन्ही एकच योजना आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे आंबे (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथे भीमा नदीवर कोल्हापूर पध्दतीचा बंधारा बांधण्याबाबत

**(४६) * ३६९२३ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर तालुक्यातील तालुका क्षेत्र व पुळूज पोहरगाव आंबेचिंचोली या गावांना जाण्यासाठी सुमारे ३० ते ३५ कि.मी. अंतर पार करून जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे आंबे (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथे भीमा नदीवर कोल्हापूर पध्दतीचा बंधारा बांधण्यासाठी नागरिकांकडून मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बंधाऱ्यामुळे पंढरपूर तालुका व पुळूज पोहरगाव आंबेचिंचोली गावातील अंतर कमी होऊन सदर बंधाऱ्यात पाणी अडल्यामुळे आंबे, चळे, तारापूर, खरोसोळी, गावातील पाणी पातळीत वाढ होऊन जमीन ओलिताखाली आणण्यास मदत होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मौजे आंबे येथे कोल्हापूर पध्दतीचा बंधारा बांधणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) होय.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यवतमाळ येथे डॉक्टर उपस्थित नसल्याबाबत

**(४७) * ३७०११ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ येथे अपघात विभागामध्ये सिनिअर डॉक्टर उपस्थित राहत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अधिष्ठाता यांनी सदर जबाबदारी प्राध्यापक व विभाग प्रमुखावर सोपविलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) अपघात विभागामध्ये आवासी/ निवासी व अध्यापक यांची नियुक्ती ही संबंधित विभागप्रमुख व वैद्यकीय अधिक्षक यांच्या सहमतीने होत असते.
(३) चौकशी केली आहे व त्यानुसार आवश्यक कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे.
(४) कार्यवाही सुरू आहे.

-----------------

## विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यामध्ये अंगणवाडयांची इमारत बांधण्याबाबत

**(४८) * ३७२४५ श्री.रविंद्र फाटक : तारांकित प्रश्न क्रमांक २९१४० ला दिनांक ९ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यामध्ये असलेल्या २४६ अंगणवाडयांपैकी ८० अंगणवाडयांना वर्ग नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंगणवाडीची स्वतःची इमारत नसल्याने मिळेल त्या जागेवर अंगणवाडी भरावी लागत असून तेथे शिक्षण घेणाऱ्या गोरगरीब मुलांना त्याचा त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने अंगणवाडीची स्वतःची इमारत बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) विक्रमगड तालुक्यामध्ये ३७ अंगणवाडी केंद्रांना स्वत:ची इमारत नाही.
(२) हे खरे नाही.
विक्रमगड तालुक्यातील स्वत:ची इमारत नसलेल्या एकूण ३७ अंगणवाडी केंद्रांपैकी खाजगी इमारतीमध्ये १३, प्राथमिक शाळेच्या खोलीमध्ये १०, समाजमंदिरामध्ये १४ वर्ग भरविण्यात येत आहेत.
(३) स्वत:ची इमारत नसलेल्या अंगणवाडयांसाठी, नविन इमारत बांधण्याकरीता, त्या ग्रामपंचायत क्षेत्रात जागा उपलब्ध असल्यास अंगणवाडी इमारत बांधकाम महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत अंगणवाडी बांधकाम करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील १६ आदिवासी जिल्हयांमध्ये कुपोषित विशेष पूरक आहार देण्याबाबत

**(४९) * ३४६८० श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १६ आदिवासी जिल्हयांमध्ये तीव्र कुपोषित (सॅम व मॅम) कमी वजनाच्या बालकांसाठी गुजरातच्या धर्तीवर विशेष पूरक आहार देण्याची योजना राबविण्याचा निर्णय शासनाने माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निर्णयानुसार आतापर्यंत किती आदिवासी तालुक्यातील तीव्र कुपोषित बालकांना विशेष पूरक आहार देण्यात आला आहे,
(३) असल्यास, कुपोषित बालकांना देण्यात येणारा विशेष पूरक आहार कोणकोणत्या कंपन्यांनी किती प्रमाणात पुरविलेला आहे व त्या कंपन्यांची नावे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

राज्यातील १६ आदिवासी जिल्हयामध्ये कमी वजनाच्या बालकांसाठी एनर्जी डेन्स न्युट्रीशियस फुड (EDNF) देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.
(२) अद्यापपर्यंत कुठल्याही तालुक्यात पुरवठा सुरु झालेला नाही. आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांनी शासनाच्या मान्यतेनुसार दिनांक १७/०७/२०१७ रोजी ई-निविदा प्रकाशित केली होती. तथापि सदर टेंडर संदर्भात उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.२०५९/२०१७ दाखल झालेली आहे. सध्या सदर प्रकरण उच्च न्यायालयात प्रलंबित असल्यामुळे निविदा अंतिम करण्यात आलेली नाही. करिता कुठल्याही जिल्हयाला आयुक्त कार्यालयामार्फत अद्याप EDNF चा पुरवठा झालेला नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सातारा जिल्हयात जुने पाझर तलावातील गाळ काढण्याबाबत

**(५०) * ३६०२९ श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयात विविध ठिकाणी सन १९७२ साली बांधण्यात आलेल्या जुन्या पाझर तलावात गाळ असल्यामुळे पाणीसाठा होत नसल्याने पाण्याची तीव्र टंचाई निर्माण होत असल्यामुळे जुन्या पाझर तलावात साठलेला गाळ काढण्यासाठी लोकप्रतिनिधींनी संबंधितांकडे वारंवार मागणी केल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू पाझर तलावातील गाळ काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय.
(२) जलयुक्त शिवार अभियान तसेच गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून सातारा जिल्हयातील १०८ तलावामधून अंदाजे १२,००० ब्रास गाळ काढण्यात आलेला आहे. सदय:स्थितीत तलावामध्ये पाणीसाठा असल्याने गाळ काढण्याचे काम बंद असून पाणी कमी होताच पुनश्च: गाळ काढण्याची कामे सुरु करण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पोयनाड-श्रीगाव (ता.अलिबाग, जि.रायगड) या गावांना जोडणारा श्रीगाव नदीवरील पुलाची दुरवस्था झाल्याबाबत

**(५१) * ३५६४१ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पोयनाड-श्रीगाव (ता.अलिबाग, जि.रायगड) या गावांना जोडणारा श्रीगाव नदीवरील पुलाची दुरवस्था झाली असल्यामुळे पुल वाहतुकीस धोकादायक झाला असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नदीवरील पुलावरून पावसाळ्यात पाणी वाहून जात असल्याने दोन वर्षापूर्वी याच पुलावरून श्रीगाव येथील महिला वाहून गेल्याने तिचा मृत्यू झाला असल्याने तसेच पुलावर खड्डे पडल्याने प्रवास करताना प्रवाशी वाहून जावून जिवीतहानी होण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर पुलाचे स्ट्रक्चरल ऑडीट करून पुलाची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) प्रश्नांकित श्रीगाव नदीवर पुल नसून हा कॉजवे आहे. त्याचे स्ट्रक्चरल ऑडीट केलेले नाही. या लो लेवल कॉजवेची (सबमर्सिबल) तपासणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली आहे. पावसाळ्यात पुराच्या पाण्यामुळे कॉजवेचा पाईप फुटल्याने खड्डा पडला आहे. तात्पुरती दुरुस्ती करण्यात येवून वाहतुक सुरु ठेवण्यात आली आहे. सदर कॉजवे पाण्याखाली जाऊन वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. त्यामुळे या ठिकाणी मोठा पुल बांधण्याची आवश्यकता आहे.

जिल्हा नियोजन समितीकडे पी.सी.आय. प्राधान्य क्रम यादीमध्ये सदर ठिकाणी मोठा पुल बांधण्यासाठी पुलाच्या जोड रस्त्यासह रुपये १००.०० लक्षची मागणी केलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाला निधी देण्याबाबत

**(५२) * ३५१५४ ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाला विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी राष्ट्रीय मागासवर्ग महामंडळाकडून वर्षाला सुमारे २५ कोटी रुपयांचा निधी दिला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या दोन वर्षापासून केवळ दोन कोटी इतकाच निधी दिला असून निधी कमी मिळाल्याने महामंडळाच्या सहा योजना बंद झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) राष्ट्रीय महामंडळाकडून मागील २ वर्षात निधी प्राप्त झालेला नाही. तथापि, यापूर्वी राष्ट्रीय मागासवर्ग महामंडळाकडून प्राप्त झालेल्या निधीतील शिल्लक रकमेतून मागील २ वर्षात लाभार्थ्यांना कर्ज वाटप करण्यात आलेले आहे.
(३) राष्ट्रीय मागासवर्ग महामंडळाच्या योजनांच्या अंमलबजावणीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळाकडून विविधस्तरावर सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ऊर्ध्व गोदावरी (जि.नाशिक) प्रकल्पामधील पुणेगाव-दरसवाडी-डोंगरगाव पोहोच कालव्याची विशेष दुरुस्तीबाबत

**(५३) * ३४६९५ श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ऊर्ध्व गोदावरी प्रकल्पामधील पुणेगाव-दरसवाडी-डोंगरगाव पोहोच कालवा प्रवाहित होण्यासाठी कालव्याची विशेष दुरुस्ती करण्याची तसेच नाशिक जिल्हयातील जोड उपसा योजना क्र. ३ च्या सविस्तर प्रकल्प अहवालात या योजनेचे पाणी पुणेगाव धरणात वळविण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) होय.

(२) १) पुणेगांव डावा कालवा एकुण ६३ कि.मी. लांबीचा असून त्यापैकी कि.मी. १ ते ७ ची विस्तारीकरणाची कामे पूर्ण झालेली असून कि.मी. ८ ते २५ मधील विस्तारीकरणाची कामे विविधस्तरावर प्रगथीपथावर आहेत. तसेच कि.मी. २६ ते ६३ मधील कामे सुधारित विसर्गानुसार पूर्ण करण्यात आलेली आहेत.

२) दरसवाडी डोंगरगांव पोहोच कालवा एकूण ८८ कि.मी. लांबीचा असून कि.मी. १ ते ४२ व ७१ ते ८८ मधील कामे पूर्ण झाली असून कि.मी. ४३ ते ७० दरम्यानची कामे प्रगतीत आहेत.

३) पुणेगाव कालव्याचे पूर्ण लांबीतील अस्तरीकरणाचा समावेश उर्ध्व गोदावरी प्रकल्पाच्या मंजूर तृतीय सु.प्र.मा.प्रस्तावात नाही. तथापि, लोकप्रतिनिधीच्या मागणीच्या अनुषंगाने पुणेगांव कालव्याचे पूर्ण लांबीतील अस्तरीकरणाचा अभ्यास म.सं.सं., नाशिक यांचे मार्फत करण्याबाबतचा प्रस्ताव तयार करण्याचे काम क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे. उपसाजोड योजना क्र. ३ बाबत मागणीच्या अनुषंगाने तांत्रिक अभ्यास क्षेत्रियस्तरावर प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## हिंगोली पंचायत समितीच्या (जि.हिंगोली) गोदामातील कृषी साहित्य व अवजारे यांचा अपहार झाल्याबाबत

**(५४) * ३५१२५ श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली पंचायत समितीच्या (जि.हिंगोली) गोदामात विविध विभागाचे कृषी साहित्य व अवजारे साठविले जात असताना माहे जुलै ते ऑक्टोबर, २०१६ या कालावधीमधील अवजारांचे अपहार झाल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवजारे अपहार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
(२) व (३) पंचायत समिती स्तरावरून चौकशी करण्यात आली आहे. दोषी असलेले श्री.बी. डी. सावके, तत्कालिन गोदामपाल यांचेकडुन रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच त्यांच्याविरूध्द विभागीय चौकशी पूर्ण झाली असुन शिक्षेची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

-----------------

## बीड जिल्हा परिषदेच्या शाळा दुरुस्ती आणि नवीन इमारत बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबत

**(५५) * ३४९१५ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गेवराई (जि.बीड) तालुक्यात जिल्हा परिषदेच्या ३३१ शाळा असून यापैकी २६ शाळांच्या ८० वर्ग खोल्या धोकादायक झाल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इतर ६७ वर्ग खोल्या आणि उच्च प्राथमिक शाळांच्या ९९ तसेच आर.टी.ई. कायद्यांतर्गत १६० अतिरिक्त वर्ग खोल्या यांचे बांधकाम आणि दुरुस्ती करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लोकप्रतिनिधींनी सदर कामासाठी सुमारे दोनशे कोटी रुपये निधीची मागणी दिनांक २४ जुलै, २०१७ रोजी जिल्हाधिकारी, बीड यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, गेवराई सह बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळा बांधकामासाठी निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सन २०१६-१७ मध्ये गेवराई तालुक्यामध्ये ५० प्राथमिक शाळांच्या ६७ वर्ग खोल्या व ४५ उच्च प्राथमिक शाळांच्या ९९ वर्ग खोल्यांची दुरुस्ती करण्याबाबतच कार्यवाही सुरु आहे. तसेच ८३ शाळांसाठी आरटीई कायद्यान्वये १६० वर्ग खोल्या आराखडा करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(३) होय हे खरे आहे.
(४) बीड जिल्हा परिषद यांचेकडून शाळा बांधकाम आराखडा तयार करण्यात येत आहे.

-----------------

## धुळे येथील भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील गैरसोयीबाबत

**(५६) * ३५०९९ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे येथील भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात वैद्यकीय उपकरणे, यंत्रसामुग्रीसह अनेक सुविधा नसल्याने रुग्ण आणि नातेवाईकांची खुपच गैरसोय होत असल्याचे दिनांक १७ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील विविध यंत्रसामुग्री नादुरूस्त असणे, यंत्रसामुग्रीस लागणारे साहित्य वेळेवर उपलब्ध न होणे यामुळे रुग्ण व नातेवाईकांचा वेळ आणि पैसे मोठया प्रमाणात खर्च होत असून रुग्णांच्या नातेवाईकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रस्तुत वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील विविध असुविधांमुळे रुग्ण, त्यांचे नातेवाईक व तेथील प्रशासनात वारंवार भांडणे उद्भवत असल्याच्या पार्श्वभुमीवर या वैद्यकीय महाविद्यालयातील दुरवस्था दुर व्हावी आणि तेथे पुरेसा कर्मचारी वर्ग, वैद्यकीय उपकरणे उपलब्ध व्हावीत, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) संस्थेमध्ये उपलब्ध असलेले मनुष्यबळ व साधनसामुग्री याआधारे रुग्णालयीन सुविधांवर परिणाम होणार नाही, याची दक्षता घेतली जाते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसंतराव नाईक विमुक्त जाती, भटक्या जमाती विकास महामंडळात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(५७) * ३६१३१ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसंतराव नाईक विमुक्त जाती, भटक्या जमाती विकास महामंडळात दिनांक ३ जुलै, २०१७ ते ११ जुलै, २०१७ या ९ दिवसात ४ कोटी रुपयांचे बेकायदा कर्ज वाटप करण्यात आले असून नियमबाह्य नोकर भरती करण्यात आल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकाच व्यक्तीला ५ लाख रुपयांच्या वरील रकमेचे कर्ज वेगवेगळ्या जिल्ह्यातून देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री, इतर मागास वर्ग यांच्याकडे पत्राद्वारे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) श्री.रमेश बनसोड, तत्कालिन व्यवस्थापकीय संचालक यांच्याविरुध्द आर्थिक गैरव्यवहाराच्या तक्रारी प्राप्त झाल्याने त्यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच मुंबई आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांच्याकडे गुन्हा रजिस्टर नं. ६८९/२०१७, दिनांक ७/११/२०१७ रोजी भा.दं.वि.स. कलम १७०, १८६, १८९, ४०९, ४१६, ४२०, ४४१, ४६९, ४६६, ४६७, ४६८, ५०४, ५०६, १२० (ब) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महामंडळाच्या लातूर कार्यालयांतर्गत

झालेल्या गैरव्यवहार प्रकरणी लातूर येथील गांधी चौक पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नं. ५०५/२०१७, दिनांक ३/११/२०१७ रोजी भा.दं.वि.स. कलम ४०९, २०१, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबतचा पोलीस तपास सुरु आहे. याशिवाय प्रस्तुत प्रकरणाची चौकशी करण्यासाठी संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालय, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली असून चौकशीचे काम चालू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांतील शिक्षकांच्या बदलीबाबत

**(५८) * ३६०८२ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांतील शिक्षकांच्या बदल्यांची प्रक्रिया ग्रामविकास विभागामार्फत करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील जवळपास एक ते दीड लाख बदलीपात्र शिक्षकांच्या बदलीचा गोंधळ सुरु असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात सुरु असलेल्या जिल्हा परिषद शिक्षकांच्या बदलीचा प्रश्न सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
(२), (३) व (४) राज्यातील जिल्हा परिषदेच्या शिक्षकांचे बदल्यांसाठी सुधारित धोरण निश्चित करण्यात आले आहे. या बदल्या संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून करण्यात येणार आहेत. तथापि, राज्यातील शिक्षकांनी वेगवेगळ्या न्यायालयात दाखल केलेल्या याचिकांमुळे या प्रकरणी विलंब

झालेला आहे. २०१७-१८ चे शैक्षणिक वर्ष सुरु होऊन बराच कालावधी झाला असल्याकारणाने आता बदली न करता मे, २०१८ च्या स्थितीनुसार, मे, २०१८ च्या पूर्वी शिक्षकांची बदली करण्याचे प्रयोजित आहे.

-----------------

## मौजे वायंगणी (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) या ग्रामपंचायतीमधील गैरव्यवहाराबाबत

**(५९) * ३४७१० डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वायंगणी (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) या ग्रामपंचायतीमध्ये सन २०१२-१३ या आर्थिक वर्षामध्ये १,९८,२६२/- रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा अहवाल उपमुख्यलेखा, स्थानिक निधीलेखा, सिंधुदुर्ग यांनी गटविकास अधिकारी, कणकवली यांना दिनांक ३ जून, २०१४ रोजी दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवालाच्या अनुषंगाने गटविकास अधिकारी, कणकवली यांनी वायंगणी ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसेवक यांच्याकडून खुलासा करण्याच्या नोटीसा दिनांक १२ डिसेंबर, २०१४ रोजी काढल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सन २०१०-११ व सन २०११-१२ या आर्थिक वर्षातील लेखा परिक्षण अहवालात ८,०६,८६६/- रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा अहवालही दिनांक ३ जुलै, २०१३ रोजी गटविकास अधिकारी, कणकवली यांना दिल्यानंतर गटविकास अधिकारी यांनी वायंगणी ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसेवक यांना दिनांक २३ जानेवारी, २०१५ रोजी खुलासा करण्याच्या नोटीसा काढल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सन २०१०-११, सन २०११-१२ व सन २०१२-१३ या आर्थिक वर्षातील गैरव्यवहाराबाबत गटविकास अधिकारी यांच्याकडून चौकशी होत नसल्याने सिंधुदुर्गातील मालवण-कुडाळचे लोकप्रतिनिधी व आदिनाथ सेवा मंडळ ताम्हणकरवाडी वायंगणी (मुंबई) यांनी दिनांक ७ ऑक्टोबर, २०१६ रोजी मा.ग्रामविकास मंत्री यांना लेखी पत्र पाठवून याप्रकरणी चौकशी करुन

वायंगणी ग्रामपंचायत सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामसेवक यांनी शासकीय निधीचा गैरवापर केल्याप्रकरणी त्यांच्यावर गुन्हे दाखल करावेत अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२), (३) व (४) होय, हे खरे आहे.

(५) होय, चौकशी केली आहे.

मौजे वायंगणी ग्रामपंचायतीमध्ये सन २०१२-१३ या आर्थिक वर्षामध्ये रुपये १,९८,२६२/- व सन २०१०-११, सन २०११-१२ या आर्थिक वर्षामध्ये रुपये ८,०६,८६६/- ची गंभीर अनियमितता झाल्याचा गोपनीय अहवाल सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग कार्यालयास सादर केला आहे. त्यानुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग कार्यालयाने तात्काळ चौकशी करून जबाबदार ग्रामसेवक व सरपंच यांना नोटीस दिल्या आहेत.

उपरोक्त दोन्ही गोपनीय अहवालामध्ये लेखापरीक्षणाच्यावेळी दप्तर उपलब्ध करून न दिल्यामुळे सदरचा आक्षेप घेण्यात आलेला आहे. त्यामुळे सन २०१०-११ ते सन २०११-१२ व सन २०१२-१३ या कालावधीच्या लेखापरीक्षणाच्यावेळी उपलब्ध न झालेल्या कागदपत्रांचे लेखापरीक्षण करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनी त्यांच्या दिनांक ३१/०७/२०१७ रोजीच्या पत्रान्वये सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांना कळविले. त्यानुषंगाने उपरोक्त कालावधीचे लेखापरीक्षण सन २०१६-१७ च्या नियमित लेखापरीक्षणावेळी करणेबाबत सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालयाने त्यांच्या दिनांक २५/१०/२०१७ च्या पत्रान्वये कळविले आहे. सदर लेखापरीक्षणाचा अहवाल प्राप्त होताच त्यानुसार तात्काळ कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## औरंगाबाद जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या शाळेच्या इमारतींची दुरवस्था झाल्याबाबत

**(६०) * ३५४१९ श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयात जिल्हा परिषदेच्या २१०९ शाळा असून त्यापैकी १५०० शाळांच्या इमारती मोडकळीस आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शाळांमध्ये ग्रामीण भागातील ४ लाख विद्‌यार्थी शिक्षण घेत असून या इमारती स्वातंत्र्यपुर्व काळातील असल्याने त्यांची दूरवस्था झाल्यामुळे विद्‌यार्थ्यांची सुरक्षा धोक्यात असूनही जि.प. प्रशासन इमारती दुरुस्त करण्यास दुर्लक्ष करत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) दुर्लक्ष होत नसून शाळा दुरुस्तीसाठी जिल्हा परिषदेकडे स्वतंत्र निधी नसल्यामुळे औरंगाबाद जिल्हा परिषदेने सन २०१८-१९ करिता जिल्हा परिषदेच्या मोडकळीस आलेल्या शाळांच्या दुरुस्तीकरिता जिल्हाधिकारी (नियोजन) यांना रुपये ६१९.०० लक्ष व नविन वर्ग खोली बांधकामाकरिता १६२.६० लक्ष असे एकुण २२३९.६० लक्ष रुपये निधी मिळण्याकरिता प्रस्ताव सादर केला आहे. त्याचप्रमाणे सन २०१७-२०१८ करिता मंजुर निधी मधून ४२ शाळेच्या ५५ वर्ग खोल्यांना प्रशासकीय मान्यता मिळण्याकरिता प्रकरण सादर करण्यात आलेले आहे.

तसेच सर्व शिक्षण अभियानांतर्गत ६५ शाळांना १०५ नविन वर्ग खोल्यास मान्यता मिळालेली असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पेट्रोल, डिझेल व गॅस दर वाढीबाबत

**(६१) * ३५६९० आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सुभाष झांबड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, अॅड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, अॅड.राहुल नार्वेकर, श्री.अनिल भोसले, श्रीमती विद्या चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे जुलै, २०१७ पासून पेट्रोल व डिझेलचे दर ७ रुपये ३० पैसे वाढले असून राज्यात पेट्रोल व डिझेल यावर रुपये ८० व रुपये ६७ दरवाढ झाल्यामुळे बाजारात पालेभाज्या, फळे, कडधान्ये व सर्वसामान्यांच्या जीवनावश्यक वस्तूंचे भाव मोठया प्रमाणात वाढल्यामुळे राज्यातील विविध भागातून निदर्शने व आंदोलने करण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबईत पेट्रोल, डिझेल तसेच एल.पी.जी.गॅस सिलेंडरचे दर इतर राज्यांच्या तुलनेत सर्वाधिक असल्याने मुंबईतील एका राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी 'जागो मुंबईकर जागो' असे जनजागरण आंदोलन माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात मुबलक पाणी असताना व दुष्काळ परिस्थिती नसतानाही पेट्रोलवर ११ रुपये दुष्काळ कर वसूल करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दुष्काळ कर रद्द करण्याबाबत व पेट्रोल, डिझेल व एल.पी.जी. गॅसच्या दरवाढ कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान पेट्रोल व डिझेलच्या किंमतीवरुन जनतेने नाराजी व्यक्त केली होती.

(२) या संदर्भामध्ये सदर आंदोलनाबाबतच्या बातम्या प्रसार माध्यमामध्ये प्रसारित झाल्या होत्या.

(३) हे खरे नाही. पेट्रोलवर दिनांक ९ ऑक्टोबर, २०१७ पर्यंत लागू असलेला रुपये ११ प्रति लिटर विक्रीकर दुष्काळी परिस्थितीकरीता तसेच दुष्काळ कर या शिर्षकाखाली गोळा केला जात नव्हता.

(४) शासनाने दिनांक १० ऑक्टोबर, २०१७ च्या अधिसूचनेन्वये डिझेल विक्रीवरील १ रुपया व पेट्रोल विक्रीवरील २ रुपये प्रमाणे विक्रीकर कमी केला आहे.

(५) लागू नाही.

-----------------

## अर्भक मृत्यूदर कमी करण्यासाठी केंद्र शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान न वापरल्याबाबत

**(६२) * ३६४२७ श्री.जगन्नाथ शिंदे, अ‍ॅड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्भक मृत्यूदर कमी करण्यासाठी केंद्र शासनाच्या तेराव्या वित्त आयोगामार्फत प्राप्त झालेले सुमारे ५२३२.४३ लाख इतके अनुदान न वापरता तसेच शिल्लक राहिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौदाव्या वित्त आयोगाचा कार्यकाळ पूर्ण होत असताना तेराव्या वित्त आयोगाने दिलेले अनुदान न वापरता शिल्लक राहण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने केंद्र शासन निधी देत असतानाही त्याचा विनियोग नियमित कालावधीत न करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

एकूण रुपये ५२३२.४३ लक्ष पैकी रुपये ६८३.०५ लक्ष खर्च झाले असून उर्वरीत निधीच्या विनियोगाची कार्यवाही सुरु आहे.

(२) एकूण रुपये ५२३२.४३ लक्ष ची प्रशासकीय मान्यता शासन निर्णय क्र. प्रशामा-२०१७/प्र.क्र.२३१/आ-७, दिनांक २८ सप्टेंबर, २०१७ अन्वये प्राप्त झाली आहे त्यानुसार उर्वरीत कामे निविदास्तर व अंदाजपत्रके स्तरावर आहेत. सदर कामे लवकर पूर्ण करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील महसूल थकबाकी वसूल करण्याबाबत

**(६३) * ३५८५२ डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महसूल थकबाकी रूपये १ लाख ९ हजार कोटी असून रूपये २७ हजार ८२१ कोटींची थकबाकी गेल्या पाच वर्षापासूनची असल्याची बाब कॅगच्या अहवालानूसार निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वसुलीसाठी कोणताही पाठपुरावा न केल्याने मोठ्या प्रमाणात थकबाकी वाढली असल्याचे कॅगने अहवालात नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त शिल्लक महसूल वसूलीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय, हे खरे आहे. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या दिनांक ३१ मार्च, २०१६ ला संपलेल्या वर्षाच्या महसूली क्षेत्रावर अहवाल याप्रमाणे ही बाब खरी आहे.

(२) हे खरे नाही. उक्त वसुलीसाठी कोणताही पाठपुरावा केला नाही असे कॅगने अहवालात नमूद केलेले नाही. कॅगने अहवालामध्ये महसूलाच्या थकबाकीची वसुली करण्यासाठी मजबूत व प्रभावी कार्यतंत्र निर्माण करण्याची गरज आहे अशी शिफारस केली आहे.

(३) शिल्लक महसूल वसूलीसाठी विविधस्तरावर प्रलंबित असलेल्या अपीलांचा निपटारा करणे, महसूली वसूली प्रमाणपत्रे जारी करुन जमीन महसूल संहितेप्रमाणे कर कसुरदाराच्या स्थावर व जंगम मालमत्तेचा लिलाव करुन वसूली करणे, तसेच करकसुरदाराच्या बँक खात्यावर व देणेदारावर टाच आणणे ई. वसुलीची उपाययोजना करण्यात येत आहे.

(४) लागू नाही.

-----------------

## औंध (जि.पुणे) येथील जिल्हा रुग्णालयातील मेट्रो ब्लड बँक बंद असल्याबाबत

**(६४) * ३६९५८ श्री.अनिल भोसले : तारांकित प्रश्न क्रमांक ३४३८२ ला दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औंध (जि.पुणे) येथील जिल्हा रुग्णालयात कोट्यवधी रुपये खर्च करुन कार्यान्वित करण्यात आलेली मेट्रो ब्लड बँक गेल्या तीन वर्षांपासून बंद असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने या मेट्रो ब्लड बँकेला अन्न व औषध प्रशासन विभागाची परवानगी मिळून ब्लड बँक कार्यान्वित करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) नाही, हे खरे नाही.

मेट्रो ब्लड बँक कार्यान्वीत झालेली नाही. तथापि, औंध (जि.पुणे) येथे अद्ययावत अशी मेट्रो रक्तपेढी प्रस्तावित आहे.

नियोजित मेट्रो रक्तपेढी ही पूर्वी ज्या ठिकाणी राज्य कामगार विमा योजना रुग्णालयाची रक्तपेढी होती त्याठिकाणी करण्याचे प्रस्तावित आहे. सदर इमारतीचे नुतनीकरण करण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात आले. परंतु सदर इमारतीचे फॉल्ससिलिंग संपूर्णत: पडले त्यामुळे प्रथमत: सदर इमारतीची छतगळती प्रतिबंधक उपाययोजना करुन घेण्यात आली. तद्नंतर फॉल्ससिलिंग व विद्युत कामे दुसऱ्यांदा करुन घेण्यात आले. सद्य:स्थितीत सदर इमारतीची किरकोळ कामे बाकी असून ती कामे तातडीने पूर्ण करुन मिळणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. बांधकाम व विद्युत कामे पूर्ण झाल्यावर अन्न व औषध प्रशासन विभागाकडे मेट्रो ब्लड बँकेस परवाना प्राप्त करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात येईल.

(२) मेट्रो ब्लड बँक अद्याप कार्यान्वित करण्यात आलेली नाही. तथापि, बांधकाम व विद्युत कामे पूर्ण झाल्यावर अन्न व औषध प्रशासन विभागाकडे मेट्रो ब्लड बँकेस परवाना प्राप्त करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात येईल.

(३) लागू नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्हा नियोजन समितीने विकासकामांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(६५) * ३५८८१ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हा नियोजन समितीचा सन २०१७-१८ करिता १७० कोटींचा आराखडा मंजूर झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैकी ८६ कोटींचा आराखडा केंद्र शासन पुरस्कृत योजनांचा आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येथील विकासकामांसाठी शासनाने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) रत्नागिरी जिल्हयासाठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०१७-१८ करीता रुपये १७०.९९ कोटींचा आराखडा मंजूर करण्यात आला असून त्यापैकी रुपये ४५.५८ कोटी इतका नियतव्यय खालील ६ केंद्र पुरस्कृत योजनांसाठी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

| अ.क्र. | योजनेचे नांव | मंजूर तरतूद |
|---|---|---|
| १. | सूक्ष्म सिंचन योजना | २४.६८ |
| २. | एकात्मिक तेलबिया उत्पादन कार्यक्रम | ८.७८ |
| ३. | राज्याचा कृषि विस्तार कार्यक्रमांना विस्तारविषयकसुधारणा करण्याकरीता सहाय्य | ८३.९६ |
| ४. | जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेला प्रशासकीय अनुदान | ५६.०० |
| ५. | शौचालय बांधकाम योजना | २२०६.२५ |
| ६. | राष्ट्रीय पेयजल योजना | २१७८.०० |
| | **एकूण** | **४५५७.६७** |

रत्नागिरी जिल्हयासाठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०१७-१८ करीता अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या एकूण रुपये १७०.९९ कोटी निधीपैकी वित्त विभागाच्या सूचनांनुसार उपरोक्त ६ केंद्र पुरस्कृत योजनांच्या मंजूर रुपये ४५.५८ कोटी निधीसह महसूली खर्चासाठी रुपये ९१.५३ कोटी निधी आणि भांडवली खर्चासाठी रुपये ४७.९१ कोटी निधी अशा प्रकारे एकूण रुपये १३९.३४ कोटी इतका निधी विकास कामांसाठी उपलब्ध करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनुदानित आश्रमशाळांमध्ये कार्यरत शिक्षक-कर्मचाऱ्यांसाठी शाळा संहितेचे सुधारीत प्रारुप मंजूर करणेबाबत

**(६६) * ३५०५८ श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.दत्तात्रय सावंत : दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक २२१४४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या अनुदानित आश्रमशाळांमध्ये कार्यरत शिक्षक-कर्मचाऱ्यांसाठी शाळा संहितेचे सुधारीत प्रारुप मंजूर करणेबाबत शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,

(२) असल्यास, शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१), (२) व (३) आश्रमशाळा संहिता लागू करण्याचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात आहे.

-----------------

## नागपूर येथील शासकीय आयुर्वेद महाविद्यालयात शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(६७) * ३५५४८ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शासकीय आयुर्वेद महाविद्यालयाला भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषदेने पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी ८४ जागांना मंजुरी दिली होती व त्यासाठी ११ शिक्षकांसह शिक्षकेतर संवर्गाची पदे भरण्याची मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासकीय आयुर्वेद महाविद्यालयामार्फत तसा प्रस्ताव वैद्यकीय शिक्षण विभागाकडे पाठविण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पदे भरण्यासाठी शासनाने मंजुरी दिली नसल्याने संस्थेला २४ पदव्युत्तर जागांना मुकावे लागले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नागपूर अंतर्गत भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषदेने ८४ जागांना मंजूरी दिली होती, हे खरे आहे. मात्र, ११ शिक्षकांसह शिक्षकेतर संवर्गाची पदे भरण्याची मागणी केली होती, हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषदेच्या निकषांनुसार अध्यापकांच्या पदांअभावी सदर महाविद्यालयातील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या २४ जागा कमी करण्यात आल्या आहेत.
(४) रिक्त पदे भरण्याची मागणी करण्यात आली नसली तरी रिक्त पदांचा आढावा घेऊन ती तातडीने भरण्यासाठी शासनस्तरावर प्रस्ताव कार्यान्वित आहे.
(५) शासनाकडे सदर पदे भरण्याबाबत मागणीच प्राप्त झालेली नसल्यामुळे विलंबाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हयातील जलयुक्त शिवार अभियानांतर्गत करण्यात येणारी कामे अपूर्ण असल्याबाबत

**(६८) * ३५४३८ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक ३३८९४ ला दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्हयातील जलयुक्त शिवार अभियानांतर्गत करण्यात येणारी कामे विहित मुदतीत पुर्ण न करणे तसेच इतर प्रकरणांवरून ५० अधिकारी व कर्मचारी यांच्याविरूध्द कारवाई करण्याबाबत जिल्हाधिकारी, परभणी यांनी माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्याविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) परभणी जिल्हयातील जलयुक्त शिवार अभियानांतर्गत करण्यात येणारी कामे विहीत मुदतीत पूर्ण न करणे व इतर प्रकरणात जिल्हाधिकारी, परभणी यांनी १३ अधिकारी व ५९ कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या. त्यानुषंगाने संबधित अधिकारी/कर्मचारी यांचे खुलासे मागवून विभागीय कृषि सहसंचालक, लातूर यांना पाठविण्यात आले होते. त्यानूसार विभागीय कृषि सहसंचालक, लातूर त्यांनी ३ कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई केलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दाभाड (ता.भिवंडी, जि.ठाणे) प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांची गैरसोय होत असल्याबाबत

**(६९) * ३६०८३ ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दाभाड (ता.भिवंडी, जि.ठाणे) प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत ३९ गावे व २२ पाडे येथे आदिवासी वस्तींचा मोठ्या प्रमाणात समावेश असून सद्य:स्थितीत या केंद्रात अनेक महिन्यांपासून एकच डॉक्टर कार्यरत असल्यामुळे सदर वैद्यकीय अधिकाऱ्यास या जबाबदारीखेरीज शासन आदेशानुसार शाळा, अंगणवाडीतील मुलांची आरोग्य तपासणी, उपकेंद्र भेट, जिल्हा-तालुका बैठकींना उपस्थित राहणे आदी कामे करावी लागत असल्याचेही माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे या आरोग्य केंद्रात उपचारासाठी दूरवरुन आलेल्या रुग्णांना सदर वैद्यकीय अधिकाऱ्याचे अनुपस्थितीमुळे उपचाराविनाच परतावे लागत असल्याने मोठी गैरसोय होत असल्याने या केंद्रासाठी आणखी दोन वैद्यकीय अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याबाबतची मागणी तेथील रुग्ण

कल्याण समितीने माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे, उपसंचालक, मुंबई विभाग, आरोग्य सेवा, ठाणे यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दाभाड प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकाऱ्यांची तातडीने नेमणूक करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे खरे आहे.

ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यात प्राथमिक आरोग्य केंद्र दाभाड अंतर्गत ३९ गावे व २२ पाडे यांचा समावेश आहे. सदर प्राथमिक आरोग्य केंद्रास वैद्यकीय अधिकारी संवर्गाची एकूण २ पदे मंजूर असून १ पद भरलेले व एक पद दिनांक १३/०६/२०१७ पासून रिक्त आहे.

माहे जुलै, २०१७ पासून प्रा.आ.केंद्र आजदे येथील वैद्यकीय अधिकारी यांना आठवडयातील दोन दिवस दाभाड येथे कामकाजाकरिता प्रतिनियुक्ती देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात बालमृत्यू झालेल्या आणि कुपोषित बालकांच्या कुटुंबियाना शिधापत्रिकेवर डाळी आणि तेल देण्याबाबत

**(७०) * ३५१६८ श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात माहे एप्रिल, २०१७ या एका महिन्यात १०३६ बालमृत्यू झालेल्या आणि ६३३४०१ कुपोषित बालकांच्या कुटुंबियांना शिधापत्रिकेवर डाळी आणि तेल देण्याची मागणी करणारे पत्र लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्र्यांना दिनांक २२ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पत्रातील मागण्यांचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.
(२) कुपोषित बालकांच्या कुटुंबियांना शिधापत्रिकेवर मुग, हरभराडाळ, रिफाईंड न केलेले पण फिल्टर केलेले शेंगदाण्याचे किंवा सोयाबीन किंवा अळशीचे तेल देण्याबाबत मा.लोकप्रतिनिधींनी मागणी केलेली आहे. तथापि, वरील धान्यादी बाबी अंगणवाडीतील लाभार्थ्यांच्या कुटुंबियांना शिधापत्रिकेवर देण्याबाबत या विभागाकडे कोणतीही योजना नाही व तसे तूर्तास प्रस्तावितही नाही.

या विभागामार्फत अंगणवाडयातील लाभार्थ्यांना पुरक पोषण आहाराचा पुरवठा बचतगट/ महिला संस्था/ महिला मंडळ यांचे मार्फत पुरविण्यात येतो.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे बावडे (ता.डहाणू, जि.पालघर) येथील रस्त्यावरील अतिक्रमणाबाबत

**(७१) * ३७३७० श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे बावडे (ता.डहाणू, जि.पालघर) येथील गट नं.२१ या रस्त्यावर श्री.बबन चुरी यांनी अतिक्रमण केले असून स्थानिक नागरिकांमध्ये दहशत निर्माण करुन उक्त रस्ता बंद केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामपंचायत बावडे (ता.डहाणू, जि.पालघर) यांनी सदर रस्त्यावरील अतिक्रमण हटवून रस्ता खुला करुन द्‌यावा असा ठराव पारित करुन आदेश काढले असून तशी श्री.चुरी यांना नोटीस बजावली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधी तसेच स्थानिक नागरिक यांनी मा.ग्रामविकास मंत्री यांना लेखी तक्रार/निवेदन करुन सुध्दा सदर रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्याबाबत गटविकास अधिकारी, पंचायत समिती, डहाणू यांचेकडून कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करुन अतिक्रमण हटविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
(२) होय.
(३) हे खरे नाही.
(४) सदर गट नं २१ वर केलेले अतिक्रमण हटविण्यासाठी तत्कालिन सरपंच, उपसरपंच, सदस्य व ग्रामसेवक यांना वारंवार नोटीसा बजावूनही अतिक्रमण हटविण्यात न आल्याने महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम १४५ अन्वये गटविकास अधिकारी, पंचायत समिती, डहाणू यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांना दिनांक २४/०३/२०११ ला प्रस्ताव सादर केला. परंतु, ग्रामपंचायतीची मुदत १६/०७/२०११ रोजी संपुष्टात आल्याने त्यावर कार्यवाही झाली नाही.

नवीन निवडून आलेल्या समितीनेही सदरचे अतिक्रमण दूर न केल्याने सरपंच ग्रामपंचायत बावडे यांचेविरुध्द महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम ३९(१) अन्वये कारवाई करणेबाबत दिनांक १७/११/२०१७ रोजी नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच तत्कालिन २ ग्रामसेवक व कार्यरत ग्रामसेवक अशा ३ जणांविरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ (३) अन्वये कारवाई करणेबाबत नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील मजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्याबाबत

**(७२) * ३५३३६ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील १७ गावातील वंचित मजुरांना रोजगाराची कामे उपलब्ध करून देण्यात आली नसल्यामुळे तहसिलदार, मोखाडा यांच्या कार्यालयावर दिनांक २१ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास श्रमजीवी संघटनेच्यावतीने आंदोलन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी रोजगाराची मागणी केलेल्या मजूरांना कामे देण्याबाबत मा.वित्त व नियोजन मंत्री, मा.आदिवासी विकास मंत्री व सचिव, रोजगार हमी विभाग यांच्याकडे दिनांक २५ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास समर्थन या संस्थेने लेखी निवेदनाद्वारे मागणी केली असून मोखाडा येथील ग्रामपंचायत हद्दीतील तसेच गाव-पाड्यांतील मजूरांनी रोजगाराची कामे मिळणेसाठी तहसिल प्रशासनाकडे २२७२ अर्ज दाखल केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने रोजगाराची कामे उपलब्ध करण्याच्यादृष्टीने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) हे खरे नाही.

प्रत्यक्षात दिनांक ०१/११/२०१७ रोजी श्रमजीवी संघटने समवेत कामाचे नियोजन करण्यासाठी बैठक घेण्यात आली.

(२) अंशत: खरे आहे.

गावपाड्यातील १५ गावातील १५९८ मजूरांचे रोजगाराची कामे मिळण्यासाठी तहसील प्रशासनाकडे काम मागणीचे अर्ज प्राप्त झाले आहेत. मागणी केलेल्या मजुरांना कामे देण्यात आली आहेत.

(३) मजूरांच्या कामाच्या मागणीनुसार कामे पुरविण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## यवतमाळ जिल्हयात नविन बांधलेल्या उपकेंद्राचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

**(७३) * ३४८९५ श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्हयातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नविन बांधलेल्या २२५ उपकेंद्रातील प्रसुती कक्षाचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याचे तसेच उपकेंद्राची दारे व खिडक्या तुटल्याचे, अनेक प्रसुती कक्षाचे स्लॅब तसेच इलेक्ट्रिकल केल गळत असल्याने याप्रकरणी चौकशी करुन दोषी कंत्राटदारांविरुध्द कारवाई करुन त्याबाबतचा अहवाल पाठविण्याबाबत जिल्हापरिषदेच्या आरोग्य विभागाच्या सभापतींनी निदेश दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे.
(२) दिनांक १३/०९/२०१७ च्या जिल्हा परिषदेच्या आरोग्य समितीच्या सभेमध्ये जिल्हा परिषदेचे सभापती यांनी या प्रकरणाची चौकशी करुन दोषी कंत्राटदाराविरुध्द कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.
सदर बाब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांच्या निदर्शनास आणून दिली असून त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पांढरी (जि.गोंदिया) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी नियमित येत नसल्याबाबत

**(७४) * ३५९११ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरी (जि.गोंदिया) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी नियमित येत नसल्याने स्थानिक रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कायमस्वरुपी वैद्यकीय अधिकाऱ्यांची त्वरीत नेमणूक करण्याबाबत स्थानिक नागरीकांची अनेक दिवसापासूनची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.
(२) सद्य:स्थितीत नजिकच्या आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्ती देऊन आरोग्य सेवा देण्यात येत आहेत. तसेच कायमस्वरुपी वैद्यकीय अधिकारी नेमण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) तक्रार प्राप्त झालेली नसल्यामुळे चौकशी करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मु.शिरसवणे ते शिरसवणे धनगरवाडी आणि दहिबेकर वाडी (ता.महाड, जि.रायगड) येथील रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(७५) * ३७२२२ श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मु.शिरसवणे ते शिरसवणे धनगरवाडी आणि दहिबेकर वाडी (ता.महाड, जि.रायगड) येथील रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे असून नागरिक व विद्यार्थ्यांचे दळणवळणाची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे सदरचा रस्ता दुरूस्तीकरीता मुख्यमंत्री निधीमधून निधी मिळणेकरिता पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून रस्त्याच्या दुरूस्तीकरीता मुख्यमंत्री निधीमधून निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अशाप्रकारची मागणी प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(३) शिरसवणे धनगरवाडी ग्रामीण मार्ग क्र. २५३ या रस्त्याची एकूण लांबी २.०० कि.मी. आहे. या रस्त्याचे मजबूतीकरण व डांबरीकरण करणे आवश्यक आहे. जिल्हा नियोजन समितीकडे पी.सी.आय. प्राधान्यक्रम यादीमध्ये सदर रस्त्याच्या कामासाठी रुपये ४०.०० लक्षची मागणी केलेली आहे. सद्य:स्थितीत या रस्त्यावरुन वाहतुक सुरु आहे.

दहिबेकरवाडी हा ६०० मीटर लांबीचा डांबरी पृष्ठभागाचा योजनाबाहय रस्ता आहे. सदर रस्ता योजनाबाह्य असल्याने जिल्हा परिषद/शासनाच्या योजनेमधून या रस्त्याचे काम करणे शक्य नसल्याने लोकप्रतिनिधींनी या रस्त्याचे काम स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सूचविणे आवश्यक आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील महिला बचतगटांना आर्थिक पुरवठा करण्याबाबत

**(७६) * ३७२६९ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.सुभाष झांबड, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील महिला बचतगटांचा आर्थिक पुरवठा मागील दीड वर्षापासून बंद असल्याने बचतगटांचे सक्षमीकरण होत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर बचतगटांना बँकांनी नियमित कर्ज पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पळशी (ता.माण, जि.सातारा) येथील माणगंगा नदीवरील बंधाऱ्यांतून पाण्याची गळती होत असल्याबाबत

**(७७) * ३५७३३ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पळशी (ता.माण, जि.सातारा) येथील माणगंगा नदीवर बांधण्यात आलेला कोल्हापुरी बंधाऱ्याच्या दरवाजातून पाण्याची मोठ्या प्रमाणात गळती सुरु असून ही गळती त्वरीत थांबविण्यात यावी, यासाठी शेतकऱ्यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दुरुस्तीस विलंब करणाऱ्या जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.
गळती झाल्याचे निदर्शनास आले. तथापि, शेतकऱ्यांनी आंदोलनाचा इशारा दिलेला नाही.
(२) दिनांक २५/१०/२०१७ रोजी बंधाऱ्याच्या काही बर्ग्यांमधून गळती होत असल्याचे निदर्शनास आले. सदरची गळती दिनांक २६/१०/२०१७ रोजी तातडीने थांबविण्यात आल्यामुळे कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नातेपुते (जि.सोलापूर) येथील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिक्षक व वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत

**(७८) * ३५५१९ श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुभाष झांबड, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नातेपुते (जि.सोलापूर) येथील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिक्षक व वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे पाच वर्षापासून रिक्त असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे रुग्णाला पुढील उपचारासाठी अकलुज व सोलापूर येथे घेवून जाण्यास सांगण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, येथील रुग्णांची गैरसोय लक्षात घेता या रुग्णालयात आवश्यक पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय नातेपुते येथील वैद्यकीय अधिक्षक हे पद ३१/१२/२०१४ पासुन रिक्त आहे. तथापि, वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे गेल्या पाच वर्षापासुन रिक्त आहे हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.

आपत्कालीन रुग्णांना (Emergency Patient) अकलुज व सोलापूर येथे संदर्भित करण्यात येते.
(३) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (ग्रेड पे रुपये ६६००) मधील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ वैद्यकीय अधिकारी (ग्रेड पे रुपये ५४००) यांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासनस्तरावर व जिल्हाधिकारी यांच्या

अध्यक्षतेखालील गठीत समितीमार्फत करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे गट-क व गट-ड संवर्गातील मंडळस्तरावरील रिक्त पदे भरण्यासाठी उपसंचालक व जिल्हा शल्य चिकित्सक यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## संत नगरी शेगांव येथील कामे अपूर्ण असल्याबाबत

**(७९) * ३५७२० श्री.गोपिकिशन बाजोरीया : दिनांक ३० जुलै, २०१५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक ४४२३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संत नगरी शेगांवला विकासात्मक दर्जा देण्यासाठी संत गजानन महाराज यांच्या समाधी शताब्दी महोत्सवानिमित्त राज्य शासनाकडून शेगांव विकास आराखड्यास सन २००९ मध्ये मंजुरी दिली असून शेगांव विकास आराखड्यात गेल्या आठ वर्षापासून मंजूर मिळूनही कामे मोठया प्रमाणात अपूर्ण अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोटयवधी रुपयांचा निधी खर्च करुनही आराखडयातील विकास कामे अपूर्ण राहण्यामागची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सातारा जिल्हयात वन्य प्राण्यांची शिकार होत असल्याबाबत

**(८०) * ३५७०४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयातील कोयना अभयारण्य, सहयाद्री व्याघ्र प्रकल्प व राज्यातील अभयारण्यात रानडुक्कर, मोर, सायाळ, ससा, सांबर आदी प्राण्यांचा दैनंदिन वावर व वाघ यासारख्या वन्य प्राण्यांची विजेचा शॉक, विषारी अन्न, गावठी बॉम्ब, सापळे लावून शिकार करणारी टोळी सक्रीय असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सातारा, सांगली, कोल्हापूर विभागात वन्य प्राण्यांच्या मांसाची विक्री केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वन व वन्यजीव विभाग यांचा यामध्ये समावेश व वरदहस्त असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील वन व वन्यजीव विभागातील वन्य प्राण्यांची होत असलेली शिकार थांबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच याप्रकरणातील दोषी असणाऱ्या वन विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) सातारा जिल्हयातील कोयना अभयारण्य, सहयाद्री व्याघ्र प्रकल्पात वन्य प्राण्यांची विजेचा शॉक, विषारी अन्न, गावठी बॉम्ब, सापळे लावून शिकार करणे असे कोणतीही घटना ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान घडलेली नाही.

तथापि, सातारा वन विभागांतर्गत असलेल्या मेढा वनपरिक्षेत्रामध्ये दिनांक २९/०८/२०१७ रोजी दोन रानडुकरे विजेच्या प्रवाहाने मारण्यात आलेली असून मृत रानडुकरांचे मांस वाहतूक करताना तीन आरोपी आढळून आलेले असून त्यांचेवर भारतीय वन अधिनियम, १९७२ अन्वये रें.गु.क्र.W/५/२०१७ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) वन्य प्राण्यांची होत असलेली शिकार थांबविण्यासाठी खालीलप्रमाणे विभागाकडून उपाययोजना करण्यात येतात :-

१. रात्रीच्या वेळेत क्षेत्रिय वन अधिकारी/कर्मचारी गस्त घालतात.

२. विभागामध्ये वायरलेस यंत्रणेव्दारे त्वरीत संपर्क साधण्याची व्यवस्था केली जाते.

३. नियतक्षेत्रामध्ये संरक्षणकुटी/ निरक्षणकुटी बांधण्यात आली असून तेथे संरक्षण मजूरांव्दारे नियंत्रण ठेवण्यात येते.

४. अधिकारी/ कर्मचारी हे जंगल फिरती व बीट तपासणी करतात.

५. वनगुन्हा घडल्यास अधिकारी/कर्मचारी वर्ग वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ अंतर्गत चौकशी करुन विहित मार्गाने पुढील कार्यवाही करतात.

या प्रकरणात वन विभागातील अधिकारी कर्मचारी दोषी आढळून आले नसल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय कार्यालयात कंत्राटी पध्दतीने नोकरभरती करण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत

**(८१) * ३७४४४ श्री.मोहनराव कदम, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याची आर्थिक स्थिती कमकुवत असल्यामुळे नोकर भरतीवर शासनाने निर्बंध आणले असल्यामुळे विविध विभागात मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त आहेत, त्याचा शासकीय कामकाजावर परिणाम होत असून अनेक विभागात अधिकाऱ्यांकडे अतिरिक्त जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय सेवेतील नोकरभरतीवर निर्बंध आणले असल्याने काही पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याचा निर्णय शासनाने घेतला असून यास शासकीय कर्मचारी संघटनांनी तीव्र विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लेखा व कोषागारे संचालनालयाने मुंबई व अन्य ३४ जिल्ह्यातील कार्यालयांमध्ये २०५ पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याचा निर्णय माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला असून कंत्राटी पध्दतीने पदे भरताना कोणत्याही विहित पध्दतीचा अवलंब न करण्यात आल्यामुळे यात मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासकीय कार्यालयातील पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याचा घेतलेला निर्णय रद्द करुन सरळसेवा पध्दतीने रिक्त पदे भरण्याबाबत व कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या भरतीत झालेल्या अनियमततेची चौकशी करुन कारवाई करण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) अंशत: खरे आहे. तथापि, कामावर परिणाम होवू नये म्हणून अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे.
(२) अंशत: खरे आहे. तथापि, सदर पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यात येत नसुन, लेखा व कोषागारे संचालनालय व अधिनस्त कार्यालयातील पदे बाह्ययंत्रणेव्दारे प्रथमत: ११ महिन्यांच्या कालावधीसाठी भरण्याबाबत लेखा व कोषागारे संचालनालयामार्फत ई-निविदा प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) नाही, हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## देवाचे गोठणे (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथे पाणलोट क्षेत्रविकास कार्यक्रमांतर्गत कामामध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(८२) * ३६०५९ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे : तारांकित प्रश्न क्रमांक २४५६४ ला दिनांक १३ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवाचे गोठणे (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथे पाणलोट क्षेत्रविकास कार्यक्रमांतर्गत सिमेंट व वळण बंधाऱ्यांची कामे दर्जाहीन व गुणवत्ताहीन झालेली असून त्यात मोठया प्रमाणात अनियमितता होऊन शासकीय निधीचा अपहार झाल्याप्रकरणी स्थानिक ग्रामस्थांनी दिनांक १० जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास तत्कालिन मा.जलसंधारण मंत्री, मा.जलसंधारण राज्यमंत्री, प्रधान सचिव, जलसंधारण विभाग, आयुक्त कृषी, पुणे व जिल्हाधिकारी रत्नागिरी यांच्याकडे लेखी स्वरुपात केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तसेच जनहित समिती, देवाचे गोठणे यांनी दिनांक २५ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, रत्नागिरी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी, आयुक्त, कृषी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे इत्यादींकडे केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने संबंधितांविरुध्द कारवाई करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) व (२) अधिक्षक कृषी अधिकारी, विभागीय कृषि सहसंचालक कोकण विभाग, ठाणे यांनी विभागीय कृषि सहसंचालक कोकण विभाग, ठाणे यांना दिलेल्या फेरतपासणी अहवालात जनहित समिती देवाचे गोठणे यांनी निदर्शनास आणून दिलेल्या बाबींमध्ये तथ्य असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आल्याने संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ च्या नियम ८ व नियम १२ मधील तरतूदीनुसार सामाईक विभागीय चौकशी करण्यासाठी त्यांच्याविरुध्द दोषारोपपत्र बजावण्यासाठीचा प्रस्ताव कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना विभागीय कृषि सह संचालक, कोकण विभाग, ठाणे कार्यालयाकडून सादर करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील जिल्हा परिषदेच्या विशेष सभा बोलविण्याच्या नियमात बदल केल्याबाबत

**(८३) * ३६८२१ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषदेची विशेष सभा बोलविण्यासाठी जिल्हा परिषदेच्या सदस्यांपैकी किमान एक पंचमांश सदस्यांनी मागणी करण्याची अट राज्य शासनाने रद्द करुन त्याऐवजी आता विशेष सभेसाठी दोन पंचमांश सदस्यांनी लेखी मागणी करणे बंधनकारक करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व निर्णयाच्या अनुषंगाने अंमलबजावणीची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) विशेष बैठकीच्या संख्येवर कोणतेही निर्बंध नसल्याने, विशेष बैठक बोलावण्याची विनंती वारंवार करण्यात येते. कायद्यातील मुळ तरतूदींमुळे अध्यक्षांना, जिल्हा परिषदेची विशेष बैठक बोलावणे अनिवार्य ठरते. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या दैनंदिन कामकाजावर परिणाम होऊ नये यासाठी निर्णय घेण्यात आला.

या अनुषंगाने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २०१७ (सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. २१) दिनांक ०७ ऑक्टोबर, २०१७ रोजी प्रख्यापित करण्यात आला असून डिसेंबर, २०१७ च्या हिवाळी अधिवेशनात सदर अध्यादेशाचे अधिनियमात रुपांतर करण्यासाठी विधेयक सादर करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दिव्यांगाना युनिक कार्ड मिळण्याबाबत

**(८४) * ३६९२७ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मोठ्या प्रमाणात बोगस अपंग व्यक्ती सापडल्याने त्यांच्यावर शासनाकडून कार्यवाही करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डिजिटल इंडियाकडे वाटचाल करताना पारदर्शकता यावी, विविध शासकीय योजनांचा लाभ खऱ्या अर्थाने मिळावा, बोगस अपंग लाभार्थ्यांना आळा बसावा यासाठी दिव्यांगाना युनिक कार्ड देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने दिव्यांगाना युनिक कार्ड मिळण्यासाठी आवश्यक असणारा ऑनलाईन अर्ज भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

शासन निर्णय दिनांक ०६/१०/२०१२ नुसार प्रत्येक रूग्णालयात अपंग प्रमाणपत्र वैद्यकीय मंडळ स्थापन करून त्यामंडळामार्फत पात्र अपंग लाभार्थींना अपंग प्रमाणपत्र संगणकीय प्रणालीद्वारे वितरित करण्यात येतात.

(२) प्रत्येक अपंग व्यक्तीला सहजरित्या शासकीय योजनांचा लाभ मिळावा तसेच पारदर्शकता यावी या उद्देशाने अपंग व्यक्तींचा राष्ट्रीय डाटाबेस तयार करून प्रत्येक अपंग व्यक्तीला वैश्विक ओळखपत्र (Universal ID) देणे या दृष्टीने “अपंग व्यक्तींसाठी युनिक आय डी (UIDD)” हा प्रकल्प केंद्र शासनामार्फत राबविण्यात येत आहे.

(३) सध्या युडीआयडी संगणकीय कार्यप्रणाली ऑनलाईन सिस्टिमद्वारे कार्यरत आहे. त्याअंतर्गत सार्वजनिक आरोग्य विभाग, सामाजिक न्याय विभाग तसेच संबधित जिल्हाधिकारी यांच्या समन्वयाने कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शासनाच्या जलसंधारण विभागाने जलयुक्त शिवाराच्या कामांसाठी सुधारित दर सूची लागू करण्याबाबत

**(८५) * ३५९९१ श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या जलसंधारण विभागाने सन २०१५-१६ आणि २०१६-१७ मध्ये प्रस्तावित जलयुक्त शिवाराच्या कामांसाठी सन २०१३-१४ या वर्षाची दर सूची लागू करण्याचे आदेश काढले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे राज्यातील जलयुक्त शिवाराची सुमारे १९ हजार ९२७ कामे बंद झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रेती, सिमेंट व इंधनाच्या दरात झालेली वाढ लक्षात घेता शासनाने चौकशी करुन सुधारित दर सूची लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) मृद व जलसंधारण विभाग परिपत्रक दिनांक ०१/११/२०१७ अन्वये मृद व जलसंधारण विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कामांच्या अंदाजपत्रकीय दरपृथक्करणासाठी विभागाची सामाईक दरसूची तयार करण्यासाठी आयुक्त, मृद व जलसंधारण आयुक्तालय, औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखाली ०७ सदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीच्या ४ बैठका झाल्या असून दरसूचीचे काम अंतिम टप्प्यात आहे.

-----------------

## कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील आदिवासींना देण्यात येणाऱ्या गॅस शेगडी योजनेच्या निधीबाबत

**(८६) * ३५५७३ श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील** : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील आदिवासींना वन विभागाकडून घरगुती गॅस शेगडी देण्याच्या योजनेसाठी वन विभागाला आदिवासी विभागाकडून देण्यात येणारा निधी मागील तीन वर्षांपासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१३-१४ मध्ये कर्जत तालुक्यातील ६०० हून अधिक लाभार्थ्यांनी अनुदानातून गॅस शेगडी मिळण्यासाठी २५ टक्के प्रमाणे रुपये १,२००/- इतकी रक्कम अदा करूनही त्यांना गॅस शेगडी मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेचा आदिवासींना लाभ होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली तसेच दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) आदिवासी विकास विभाग, शासन परिपत्रक दिनांक १८/०९/२०१५ अन्वये संरक्षित वनांच्या लगतचे क्षेत्रातील आदिवासी लाभार्थ्यांना स्वयंपाकी गॅस व सौरकुकर यांचे वाटप ही योजना राज्य योजनेमधून जिल्हा वार्षिक योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आलेली आहे. गत ३ वर्षात फक्त सन २०१५-१६ मध्ये राज्य योजनेतून प्राप्त झालेल्या निधीतून कर्जत तालुक्यातील आदिवासी लाभार्थ्यांना १३५ नवीन गॅस कनेक्शन व ६५७ रिफींलींगसाठी निधी वितरित करण्यात आलेला आहे. मात्र सदर योजनेसाठी सन २०१६-१७ व २०१७-१८ या दोन वर्षात जिल्हा वार्षिक नियोजन आराखड्यातून ता.कर्जत अंतर्गत सदर योजनेसाठी निधी प्राप्त झालेला नाही.

(२) अलिबाग वन विभागातील कर्जत तालुक्यात सन २०१२-१३ मध्ये ६५७ लाभार्थ्यांना नवीन गॅस कनेक्शन वाटप करण्यात आलेले आहे. तथापि सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात अनुदान उपलब्ध न झाल्याने लाभार्थ्यांना गॅस

कनेक्शन व सिलेंडर वाटप करण्यात आलेले नाही. तथापि, सन २०१४-१५ व २०१५-१६ या कालावधीत वरील ६५७ लाभार्थ्यांना रिफील व १३५ लाभार्थ्यांना नवीन कनेक्शन वाटप करण्यात आलेले आहे.

सदर योजनेंतर्गत ६७० लाभार्थ्यांना अद्यापी गॅस कनेक्शनचा लाभ मिळालेला नाही. उपरोक्त लाभार्थ्यांनी जमा केलेली रक्कमही संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या खात्यात जमा आहे.

(३) जिल्हाधिकारी, रायगड यांना उपरोक्त योजनेसाठी जिल्हा वार्षिक नियोजन आराखड्यातून निधी उपलब्ध करुन देण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सेनगाव (जि.हिंगोली) वनपरिक्षेत्र कार्यालय सुरु करण्याबाबत

**(८७) * ३५१२६ श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औंढा (जि.हिंगाली) येथील पूर्व विभागाच्या वनपरिक्षेत्र कार्यालयाचे विभाजन करुन सेनगाव तालुक्यातील स्वतंत्र असे वनपरिक्षेत्र १ वर्षापूर्वी स्थापन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेनगाव वनपरिक्षेत्र कार्यालयाची स्थापना एक वर्ष होऊनही कार्यान्वित झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सेनगाव वनपरिक्षेत्र कार्यालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय.

दिनांक ५/०८/२०१५ च्या आदेशान्वये हिंगोली वन विभागाची पुनर्रचना करण्यात आली त्यानुसार सेनगाव तालुक्यात स्वतंत्र असे वनपरिक्षेत्र स्थापन करण्यात आले आहे.

(२) नाही.

सेनगाव वनपरिक्षेत्राचे कार्यालय जून, २०१६ पासून सेनगाव शहरात आजेगाव रोड येथे भाडयाच्या इमारतीमध्ये सुरु करण्यात आले आहे.

(३) सेनगाव वनपरिक्षेत्र कार्यालयासाठी सेनगाव येथे गट क्रमांक ५०४ मध्ये ४० आर शासकीय जमिनीवर जिल्हाधिकारी यांचे आदेश क्रमांक २०१७/जमीन-१/सीआर/९२, दिनांक १६/८/२०१७ अन्वये ताब्यात घेण्यात आलेली असून, सदर जमिनीवर १ वनपरिक्षेत्र अधिकारी एक वनपाल निवासस्थान व वनरक्षक निवासस्थानाचे बांधकाम सुरू करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे क्षतिग्रस्त व फुटलेल्या पाझर तलावांच्या दुरुस्तीबाबत

**(८८) * ३५०७४ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयवंतराव जाधव, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३१३१७ ला दिनांक २८ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात माहे सप्टेबर, ऑक्टोबर व नोव्हेंबर, २०१६ या महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे २६४ विविध सिंचन प्रकल्प क्षतिग्रस्त झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ३ ऑक्टोबर, २०१६ रोजी व त्यानंतर अनेक वेळा जिल्हाधिकारी, बीड यांनी गेवराई विधानसभा मतदार संघातील अर्धामसला सह इतर पाझर तलाव दुरुस्तीबाबत अंदाजपत्रक सादर करण्याचे निर्देश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या तलावांच्या फुटण्यामुळे बाधित जमिनीच्या नुकसानीबाबत नुकसानग्रस्तांना शासनाने मदत दिली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच जिल्ह्यातील २६४ क्षतिग्रस्त तलावांच्या दुरुस्तीसाठी निधी मागणी प्रस्ताव शासनास कधी प्राप्त झाला, यानुसार किती निधी मागणी करण्यात आली आहे तसेच बीड जिल्ह्यातील क्षतिग्रस्त तलावांच्या दुरुस्तीबाबत शासन केव्हा निधी मंजूर करणार आहे ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

बीड जिल्हयात माहे सप्टेंबर, ऑक्टोबर व नोव्हेंबर, २०१६ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे बीड, पाटोदा, अंबाजोगाई, आष्टी, शिरूर, गेवराई, माजलगाव, वडवणी, केज, धारूर व परळी तालुक्यातील २६४ विविध लघुसिंचन कामे क्षतिग्रस्त झाले आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

अतिवृष्टीमुळे क्षतिग्रस्त झालेल्या तलावांच्या दुरूस्तीसाठी आवश्यक निधी मागणी प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिनांक १६ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या जिल्हा आढावा बैठकीमध्ये जिल्हाधिकारी, बीड यांनी दिल्या आहेत.

(३) बाधित जमिनीच्या नुकसानीबाबतची कार्यवाही महसूल यंत्रणेमार्फत केली जाते.

(४) लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, बीड अंतर्गत ९ पाझर तलाव व २ कोल्हापूरी बंधारे क्षतिग्रस्त झाले असून ९ पाझर तलावांच्या दुरूस्तीसाठी रुपये ६८.५० लक्ष निधी मागणीचा प्रस्ताव दिनांक ०७/१०/२०१६ रोजी जिल्हाधिकारी, बीड यांना सादर करण्यात आला आहे. २ कोल्हापूरी बंधाऱ्यांना जलयुक्त शिवार अभियानांतर्गत प्रशासकिय मान्यता प्राप्त असून तांत्रिक मंजुरीची कार्यवाही प्रगतीत आहे. त्यापैकी कोल्हापूरी बंधारा लोळदगावचे माती भरावाचे काम सुरू आहे. तसेच या विभागांतर्गतच्या ०७ फुटलेल्या तलावांच्या संयुक्त मोजणीचे आदेश दिनांक २०/११/२०१७ रोजी अधिक्षक अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) मंडळ, औरंगाबाद कार्यालयाकडून देण्यात आलेले आहेत.

उर्वरित २५३ लघुसिंचन प्रकल्प जिल्हा परिषद, बीड यांचे कार्यक्षेत्रातील असून त्यांचे दुरूस्तीकरिता रुपये १७.११ कोटी निधी मागणीचा प्रस्ताव दिनांक १०/११/२०१६ रोजी अधिक्षक अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) यांनी जिल्हाधिकारी, बीड यांना सादर केलेला आहे.

-----------------

## नाशिक शहर व ग्रामीण भागात स्वाईन फ्ल्यू व डेंग्यूची लागण झाल्याबाबत

**(८९) * ३५०९५ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहर व जिल्हा परिसरात स्वाईन फ्ल्यू, डेंग्यू आजाराचा प्रादुर्भाव वाढत असून नाशिक शहरात स्वाईन फ्ल्यूमुळे माहे जानेवारी ते दिनांक ११ ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत ७० रुग्णांचा मृत्यू झाला असून स्वाईन फ्ल्यू व डेंग्यूचे नवीन रुग्ण सातत्याने आढळून येत असल्याचे दिनांक १४ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये स्वाईन फ्ल्यूचे २२ पॉझिटीव्ह रुग्ण तर डेंग्यूचे ५८ रुग्ण आढळून आले असून खाजगी रुग्णालयातील रुग्ण मोठ्या प्रमाणात असून माहे सप्टेंबर, २०१७ मध्येही डेंग्यूची १२२ जणांना तर स्वाईन फ्ल्यूची ४८ जणांना लागण झाली व स्वाईन फ्ल्यूमुळे ७ जणांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्वाईन फ्ल्यू व डेंग्यूचा वाढता प्रादुर्भाव रोखणेस स्थानिक आरोग्य यंत्रणा अपयशी ठरली असून, स्थानिक आरोग्य यंत्रणेकडून व खाजगी डॉक्टरांकडून वेळीच स्वाईन फ्ल्यूची लक्षणे ओळखणे व त्यावरील तातडीच्या उपचारास तसेच आजाराच्या नियंत्रणासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेस विलंब होत असल्याने रुग्णांचा मृत्यू होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नाशिक शहरात व जिल्ह्यात स्वाईन फ्ल्यूमुळे दगावलेल्या रुग्णांची वाढती संख्या पाहता, खाजगी उपचार करणाऱ्या डॉक्टरांना स्वाईन फ्ल्यूचा संशय असलेल्या रुग्णास त्वरीत प्रतिबंधक उपचार सुरु करणे व अधिकचा तातडीचा उपचार आवश्यक असलेल्या रुग्णालय, जिल्हा रुग्णालय वा अद्ययावत रुग्णालयात पाठविण्याचे तसेच स्थानिक आरोग्य यंत्रणेस या आजाराच्या नियंत्रणासाठी प्रभावी उपाययोजनेचे निर्देश देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

जानेवारी ते ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत नाशिक (शहर व ग्रामीण) जिल्हयात स्वाईन फ्ल्यू या आजारामुळे ६२ जणांचा मृत्यू झाला. याच काळात डेंग्यूमुळे नाशिक जिल्हयात १ मृत्यू झाला आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

नाशिक शहर आणि जिल्ह्यात स्वाईन फ्ल्यू आणि डेंग्यू आजाराची परिस्थती पुढीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | आजार | सप्टेबर, २०१७ | | ऑक्टोबर, २०१७ | |
|---|---|---|---|---|---|
| | | रुग्ण | मृत्यू | रुग्ण | मृत्यू |
| १ | डेंग्यू | ११८ | १ | २६० | १ |
| २ | स्वाईन फ्ल्यू | ६७ | १५ | ४१ | ६ |

(३) हे खरे नाही.

स्वाईन फ्ल्यू आणि डेंग्यू प्रतिबंध व उपचारासाठी खालीलप्रमाणे उपायोजना करण्यात आल्या आहेत.

- राज्यस्तरीय संसर्गजन्य आजार प्रतिबंध समितीमार्फत वेळोवेळी उपाययोजना निर्गमित करण्यात येत आहेत.
- साथरोग रुग्णांचे नियमित सर्वेक्षण.
- इन्फल्यूएंझाकरीता पुरेशी स्क्रिनिंग सेटर्स आणि विलगीकरण कक्ष कार्यरत.
- निदानासाठी प्रयोग शालेय सुविधा.
- डेग्यूसाठी नियमित किटकशास्त्रीय सर्वेक्षण आणि कार्यवाही.
- साथरोगासाठी पुरेसा औषधसाठा.
- इन्फल्यूएंझा प्रतिबंधासाठी अतिजोखमीच्या व्यक्तींना मोफत व ऐच्छिक लसीकरण.

- साथरोग संदर्भात शासकीय व खाजगी डॉक्टरांच्या कार्यशाळा.
- एकात्मिक किटक व्यवस्थापन.
- लोकसहभाग आणि आरोग्य शिक्षण.

(४) स्वाईन फ्ल्यू प्रतिबंध आणि नियंत्रण यासंदर्भात शासकीय तसेच खाजगी डॉक्टरांच्या कार्यशाळा घेण्यात आल्या असून या संदर्भातील सर्व मार्गदर्शक सूचना सर्व संबंधितांना देण्यात आल्या आहेत.

(५) नाशिक जिल्हयातील साथरोग परिस्थितीचा जिल्हा तसेच विभागीय आणि राज्यस्तरावर वेळोवेळी आढावा घेण्यात आला असून साथरोग परिस्थितीनुसार सुयोग्य सूचना संबंधितांना देण्यात आल्या. या संदर्भात कोणताही विलंब झालेला नाही.

-----------------

## अंगणवाडी सेविकेने (ता.जि.हिंगोली) आत्महत्या केल्याबाबत

**(९०) * ३६१४७ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंगणवाडी सेविका म्हणून कार्यरत असणाऱ्या सुमित्रा राखुंडे (ता.जि.हिंगोली) या महिलेने आत्महत्या केल्याची घटना माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील पाच महिन्याचा पगार न मिळाल्यामुळे तसेच सन २००८ च्या रेकॉर्ड तपासणीच्या कामाच्या ताणामुळे आत्महत्या करीत असल्याचे तिने मृत्यूपुर्व चिठ्ठीत लिहून ठेवल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आत्महत्या प्रकरणी सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी अंगणवाडी कर्मचारी संघटनेने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अंगणवाडी कर्मचाऱ्यांना वेळेवर मानधन देणे, त्यांच्या कामाचा ताण कमी करणे याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) चिठ्ठीमध्ये विविध मुद्दयांचा समावेश आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) होय.

संबंधित सेविका यांना दिनांक १४/०७/२०१७ रोजी रुपये ६१२४/- (माहे एप्रिल व मे, २०१७) चे नियमित मानधन उपलब्ध करुन देण्यात आले होते. संबंधिताची PFMS प्रणालीमध्ये सुरुवातीस प्राथमिक माहिती भरण्यात आलेली होती. तथापि सदरील माहिती PFMS प्रणालीमध्ये रजिस्ट्रेशन करिता पाठविले असता त्यांचे नावासमोर Invalid आधार क्रमांक हा शेरा प्राप्त झाला त्यामुळे संबंधितांची आधार क्रमांक माहिती दुरुस्तीसह PFMS मध्ये भरण्यात आली. तसेच संबंधिताचा आधार क्रमांक बँक खात्याशी संलग्न आहे किंवा कसे याबाबत प्रकल्प कार्यालयामार्फत खात्री करण्यात आली. तद्नंतर संबंधिताची PFMS प्रणालीमध्ये नोंद झालेली आहे. या सर्व बाबींमुळे संबंधिताचे मानधन वेळेवर पुर्ण होऊ शकले नाही. संबंधिताने यापुर्वी मानधन विलंब तथा आर्थिक विवंचनेबाबत कोणतीही लेखी अथवा तोंडी तक्रार या कार्यालयास अथवा प्रकल्प कार्यालयास सादर केलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणी संबंधित बीटच्या अंगणवाडी पर्यवेक्षिका श्रीमती ए.ए. गुंजोटीकर यांना संबंधिताचा प्राप्त खुलासा असमाधानकारक असल्यामुळे तसेच संबंधिताविरुध्द प्राप्त तक्रारीची चौकशी करणे आवश्यक असल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी त्यांचे आदेश दिनांक २७/११/२०१७ नुसार जिल्हा परिषद सेवेतून आदेशाच्या दिनांकापासून निलंबित केलेले आहे.

आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना, नवी मुंबई यांचे आदेश दिनांक २९/९/२०१७ नुसार प्रति अंगणवाडी देय परिवर्तनीय निधी रुपये १०००/- अंगणवाडी स्तरावर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. यामधून किरकोळ खर्च, वजनकाटे दुरुस्ती, अत्यावश्यक किरकोळ साहित्य खरेदी तसेच अत्यावश्यक रजिस्टर खरेदी, इत्यादीसाठी संबंधित अंगणवाडी सेविकेस अनुमती देण्यात आलेली आहे.

त्याचप्रमाणे अंगणवाडी सेविका श्रीमती सुमित्रा राखुंडे यांच्या मृत्यू प्रकरणी या रुपये १ लक्ष द्यावयाच्या एकरकमी लाभ योजनेचा प्रस्ताव एल.आय.सी. पुणे यांचेकडे दिनांक २९/११/२०१७ रोजी पाठविण्यात आला आहे.

तसेच महिला व बालविकास विभाग, शासन परिपत्रक दिनांक २९ जुलै, २०१७ अन्वये अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका या मानधनी कर्मचाऱ्यांना एकात्मिक बालविकास सेवा योजना व्यतिरिक्त कोणतीही योजनाबाहय कामे न देण्याबाबत व महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय दिनांक १६ ऑक्टोंबर, २०१७ अन्वये डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम अमृत आहार योजनेंतर्गत अंगणवाडी सेविकांवर सोपविण्यात आलेल्या कामात बदल करणेबाबत सर्व संबंधितांना आदेशित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद सिंचन विभागांतर्गत कोल्हापुरी बंधाऱ्यांना गेट बसविणेबाबत

**(९१) * ३५४२३ श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक २५१९६ ला दिनांक ६ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हा परिषद, सिंचन विभागांतर्गत जिल्हयात ५४८ कोल्हापूरी बंधाऱ्याची कामे केली असून १४४ बंधाऱ्यांना गेट नसल्याने पाणी अडविण्यास अडचणी येत असल्याने सन २०१५ मध्ये १४४ बंधाऱ्यांना आवश्यक असणारे ३०३८ गेट बसवण्यासाठी कार्यवाही केली, परंतू अद्याप गेट बसवले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर बंधाऱ्यांना गेट बसवण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय, हे खरे आहे. जिल्हा परिषदेने सुरु केलेली गेट खरेदी प्रक्रिया पुर्ण झाली नसल्यामुळे व तद्‌नंतर गेट खरेदीच्या अंदाजपत्रकास दिलेली प्र.मा.जिल्हा परिषदेने रद्द केल्यामुळे गेट बसविण्यात आले नाहीत.

(२) चौकशी करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील बेकायदेशीर सोनोग्राफी केंद्रावर कारवाई करण्याबाबत

**(९२) * ३५९२६ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रविंद्र फाटक, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अनिल भोसले, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पीसीएनडीटी कायद्यांतर्गत सोनोग्राफी केंद्राना नोंदणी करणे बंधनकारक असतानाही राज्यातील ७४ सोनोग्राफी केंद्रांनी नोंदणीच केली नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बेकायदा सोनोग्राफी केंद्रावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यामध्ये सन २००२ पासून ते सप्टेंबर, २०१७ अखेर एकूण ७६ सोनोग्राफी केंद्रांनी नोंदणी केली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) सन २००२ ते सन २०१७ या कालावधीत नोंदणी नसलेल्या ७६ केंद्रांविरुध्द मा.न्यायालयांमध्ये प्रकरणे दाखल करण्यात आली आहेत. त्यापैकी ४९ प्रकरणांचा निकाल लागलेला असून त्यापैकी २० जणांना शिक्षा झालेली आहे व २७ प्रकरणे प्रलंबित आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पाडाळे (ता.मुरबाड, जि.ठाणे) येथे पाटबंधारे प्रकल्प बाधितांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत

**(९३) * ३६४२३ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाडाळे (ता.मुरबाड, जि.ठाणे) येथे पाटबंधारे विभागाने धरण प्रकल्पास मंजूरी दिल्यानंतर सन २०१३ मध्ये कामास सुरूवात करण्यात आली असून या धरणाच्या कालव्यासाठी माझगाव, माणवली, ठुणे, नांदगाव, पाडाळे येथील १६२ शेतकऱ्यांची जमीन संपादित केली असतानाही अद्यापपर्यंत सदरहू शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित प्रकल्प बाधितांना विनाविलंब नुकसान भरपाई/मोबदला मिळावा यासाठी शेतकऱ्यांनी मुरबाड तहसिल कार्यालयावर मोर्चा नेला असता अशोक देसले या शेतकऱ्याने तहसिल इमारतींवरून उडी टाकून आत्महत्या केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला न देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला विनाविलंब मिळण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) होय.

पाडाळे कालव्यासाठी ७ गावातील माझगाव, माणवली, ठुणे, नांदगाव, पाडाळे, कान्हर्ले व कळंभे येथील १६२ शेतकऱ्यांची जमीन संपादित केली असून आजमितीस सदरहू शेतकऱ्यांना भूसंपादन कार्यवाही पूर्ण न झाल्याने नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही.

(२) श्री.अशोक देसले या शेतकऱ्याने तहसिल कार्यालयाच्या इमारतीवरून आत्महत्या केल्याचे अद्याप निष्पन्न झालेले नाही, सदर प्रकरण तपासाधीन आहे.

(३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय, दिनांक १२/०५/२०१५ व दिनांक ३०/०९/२०१५ अन्वये सुधारित सिंचन व इतर प्रकल्पासाठी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने घेण्याबाबतचा दिनांक २५/०१/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये संपादित करावयाच्या खाजगी जमिनीचा थेट खरेदी प्रस्ताव उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी, कल्याण, उपविभाग कल्याण यांना दिनांक १०/११/२०१७ रोजी सादर करण्यात आला आहे.

सदरची जमीन नविन भूसंपादन कायदा-२०१३ नुसार थेट खरेदीने संपादित करण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील खेड्यांच्या विकास ग्रामसमाज परिवर्तन फाऊंडेशन अंतर्गत करण्याबाबत

**(९४) * ३७१७५ डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.जनार्दन चांदूरकर : तारांकित प्रश्न क्रमांक २७९४१ ला दिनांक ९ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १ हजार खेडयांचा उद्योगविश्वाच्या मदतीने विकास करण्याची योजना सुरु करण्याबाबत मा.मुख्यमंत्री यांनी माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घोषित केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी रतन टाटा यांच्यासह उद्योगविश्वातील अनेक उद्योगपती आणि श्री.अमिताभ बच्चन यांना घेवून ग्रामसमाज परिवर्तन फाऊंडेशनची स्थापना करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेंतर्गत निधी उपलब्ध असतांनाही गावाच्या विकासाची कामे अद्याप सुरु झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर योजनेची कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) राज्यातील पालघर, नंदुरबार, औरंगाबाद, वर्धा, बीड, परभणी, रायगड, यवतमाळ, गडचिरोली, चंद्रपूर, नांदेड, अमरावती या १२ जिल्ह्यांतील १४० ग्रामपंचायतींचा या योजनेमध्ये समावेश करण्यात आलेला आहे. या अभियानांतर्गत निवडलेल्या ग्रामपंचायतींमधील संबंधित गावांमध्ये नियुक्त केलेल्या मुख्यमंत्री ग्राम परिवर्तकामार्फत (CMGP) तयार करण्यात आलेल्या ग्रामविकास आराखड्याची अंमलबजावणी सुरू झाली आहे.

या अभियानांतर्गत १४५ ग्रामपंचायतींमध्ये ग्राम कोष खाते उघडण्याची कार्यवाही सुरू झाली आहे. ९ जिल्ह्यांमध्ये २१४ गावांना आतापर्यंत रुपये ७.५ कोटी gap funding म्हणून हस्तांतरित केला आहे.

या अभियानांतर्गत निवडलेल्या १४५ ग्रामपंचायतींमध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत अंदाजे ७५०० पक्की घरे बांधण्यासाठी मंजुरी मिळाली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हयातील विहिरींची कामे अपूर्ण असल्याबाबत

**(९५) * ३७००३ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.आनंदराव पाटील, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या साडे तीन हजार विहिरींची कामे प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा परिषदेने या योजनेंतर्गत तब्बल १५ हजार ८५३ विहिरींना प्रशासकीय मान्यता प्रदान केली असतांना विहिरी खोदण्याचे काम संथगतीने होत असल्याने केवळ ६ हजार ३१५ विहिरी पूर्ण झाल्या आहेत आणि ३ हजार ७२१ विहिरींसाठी निधी शिल्लक नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आवश्यक निधीची पूर्तता करण्यासाठी व ग्रामीण रोजगार हमी योजनेची सद्य:स्थिती जाणून घेण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) व (२) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत यवतमाळ जिल्हयात १३,१६५ वैयक्तिक सिंचन विहिरींची कामे हाती घेण्यात आली आहेत. त्यापैकी आजपावेतो ७,३१३ कामे पूर्ण झाली असून, ५,८५२ विहीरींची कामे प्रगतीपथावर आहेत. ग्रामपंचायत स्तरावर मजूरांच्या मागणीप्रमाणे सदर कामे पूर्ण करण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

सदर जिल्हयात ५० टक्के काम पूर्ण झालेल्या विहिरींची संख्या १,२५९ इतकी आहे. तसेच ७५ टक्के काम पूर्ण झालेल्या विहिरींची संख्या १,२५६ इतकी आहे. त्यानुसार उपलब्ध झालेल्या निधीतून सदर कामे पूर्ण करण्याची कार्यवाही पंचायत समितीस्तरावरून सुरू आहे.
(३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सन २०१७-१८ मध्ये कुशल खर्चाकरिता केंद्र शासनाकडून रुपये ३४५०६.६९ लक्ष व राज्य शासनाकडून रुपये १०५०२.३६ लक्ष असा एकूण रुपये ४५००९.०५ लक्ष इतका निधी सर्व जिल्हयांना उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्यापैकी, यवतमाळ जिल्हयामध्ये केवळ विहिरींकरिता रुपये ७८२.८४ लक्ष इतका निधी खर्च करण्यात आला आहे. यवतमाळ जिल्हयातील ७५ टक्क्यांपेक्षा जास्त काम झालेल्या विहिरींना तातडीने आवश्यक कुशल निधी उपलब्ध करुन देण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## राज्यात शासकीय कर्मचाऱ्यांना अपघात विमा योजना लागू करण्याबाबत

**(९६) * ३७१०५ श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक ३३४५० ला दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासकीय कर्मचाऱ्यांना अपघात विमा योजना लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णय राज्यातील निमशासकीय संस्था (कार्यालये) व शिक्षक कर्मचाऱ्यांना लागू नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील शिक्षक कर्मचाऱ्यांना व निमशासकीय कर्मचाऱ्यांना अपघात विमा योजना लागू करण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय.

(२), (३), (४) व (५) "राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात विमा योजना" राज्यातील शासकीय विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व निमशासकीय कार्यालये, जिल्हा परिषदा, पंचायत समिती, ग्राम पंचायती, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती शासकीय महामंडळे, मंडळे, सार्वजनिक उपक्रम, सांविधानिक संस्था, मान्यता प्राप्त व अनुदान प्राप्त शैक्षणिक संस्था/महाविद्यालये, कृषी विद्यापीठे, पारंपारिक विद्यापीठे यांच्या अधिकारी/कर्मचारी यांना दिनांक १ ऑगस्ट, २०१७ पासून वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ अन्वये लागू केली आहे.

-----------------

## तळवाडे (भामेर) (ता.सटाणा, जि.नाशिक) येथे बिबट्याच्या हल्ल्यात बालकाचा मृत्यू झाल्याबाबत

**(९७) * ३७०६५ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळवाडे (भामेर) (ता.सटाणा, जि.नाशिक) येथे बिबट्याच्या हल्ल्यात अडीच वर्षाच्या बालकाचा मृत्यू झाल्याची घटना माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) मौजे तळवाडे (भा.) येथे दिनांक २१/१०/२०१७ रोजी मालकी गट क्रमांक २६२ मध्ये बिबट्याच्या हल्ल्यात चि.कोमल नामदेव नामदास याचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे.

(२) व (३) प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार मृत मुलाचे कायदेशीर वारस आई व वडील यांच्या संयुक्त खात्यावर धनादेशाद्वारे रुपये १.०० लाख अदा करण्यात आले असून रुपये ७.०० लाख वारसांच्या नावाने मुदत ठेव (Fixed Deposit) जमा करण्यात आले आहे. असे एकूण रुपये ८.०० लक्ष आर्थिक मदत देण्यात आली आहे.

-----------------

## परभणी जिल्हयातील वृक्ष लागवडीबाबत

**(९८) * ३५४३४ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक २८०८ ला दिनांक ३० मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयात माहे जुलै, २०१७ मध्ये लागवड करण्यात आलेल्या वृक्ष लागवडीपैकी बहुतांशी लागवड केवळ कागदोपत्रीच झालेली असल्याने त्याची चौकशी करण्यात यावी अशी मागणी परभणी येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वृक्ष लागवडीची सत्यता तपासण्यासाठी जिल्हाधिकारी परभणी यांच्यास्तरावरून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय, हे खरे आहे.
(२) परभणी जिल्हयात वन विभागाद्वारे १७ ठिकाणी केलेल्या वृक्ष लागवडीच्या जिवंत रोपांची टक्केवारी ९५.०८% असून सामाजिक वनीकरण विभागामार्फत २३ ठिकाणी केलेल्या रस्ता दुतर्फा वृक्ष लागवडीपैकी जिवंत रोपांची टक्केवारी ९४.८७% आहे. तसेच दोन ठिकाणी केलेल्या गट लागवडीतील जिवंत रोपांची टक्केवारी ९३% एवढी आहे.

तक्रारीच्या अनुषंगाने वृक्ष लागवडीची सत्यता पडताळणीसाठी जिल्हाधिकारी, परभणी यांनी सखोल चौकशी करण्याबाबत मुख्य वरसंरक्षक (प्रा.), औरंगाबाद यांना सूचना दिल्या आहेत.

सदर कामांची स्थळ पाहणी करून अन्वेषण अहवाल सादर करण्याची बाब मुख्य वरसंरक्षक (प्रा.), औरंगाबाद यांच्या कार्यवाहीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मध्य वैतरणा धरणावर जलविद्युत प्रकल्प राबविण्याबाबत

**(९९) * ३६०९० ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने सन २००८ मध्ये (ता.शहापूर, जि.ठाणे) मध्य वैतरणा धरणावर जलविद्युत प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेऊन सल्लागार नेमून त्यासाठी रुपये ५१ कोटी महापालिकेने खर्च केला आहे, तसेच सदर

जलविद्युत प्रकल्पास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव महापालिकेने शासनाकडे (जलसंपदा विभाग) सन २०१० मध्ये सादर केला असून मागील ७ वर्षात वारंवार पाठपुरावा केला असल्याचे दिनांक १८ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सेवा हक्क विषयक कायदा शासनाने पारित केला असताना व त्यानुसार प्रकरणाधिन कार्यवाहीचा कालावधी निश्चित केला असतानाही मागील ७ वर्षांपासून सदर जलविद्युत प्रकल्पास मान्यता न देण्याची कारणे काय आहेत, त्याचप्रमाणे या प्रकल्पाच्या प्रलंबित प्रस्तावाच्या मान्यतेबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व शासनाच्या मान्यतेअभावी या प्रकल्पाच्या सल्लागारावर करण्यात आलेला खर्च वाया जाण्यास जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने, मध्य वैतरणा धरणावर जलविद्युत प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेऊन त्यास शासनाची (जलसंपदा विभाग) मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव सन २०१० (दिनांक ३०/०६/२०१०) मध्ये सादर केला होता हे खरे आहे.

सदर प्रकल्पासाठी सल्लागारावर महापालिकेने खर्च केला असल्याबाबतची माहिती/आकडेवारी जलसंपदा विभागाकडे उपलब्ध नाही. प्रकल्प मंजूरीबाबत महानगरपालिकेकडून जलसंपदा विभागाकडे पाठपुरावा करण्यात आला आहे.

मध्य वैतरणा हा बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रासाठी पाणीपुरवठा प्रकल्प आहे. राज्यातील जलविद्युत प्रकल्पांचे सर्व्हेक्षण, नियोजन व कार्यान्विनीकरण करणे ही जबाबदारी जलसंपदा विभागावर सोपविण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाने दिनांक १५/०९/२००५ च्या शासन निर्णयान्वये जाहिर केलेल्या धोरणानुसार, २५ मे.वॅ. पर्यंतचे, जलविद्युत प्रकल्प हे खाजगी प्रवर्तकांना विकसनासाठी देण्यात येतात.

या धोरणानुसार मे.महालक्ष्मी कोनाल ऊर्जा प्रा.लि., पुणे यांनी दिनांक २०/०१/२०१० रोजी जलविद्युत प्रकल्प विकसनासाठी मागणी केली होती. तसेच मुंबई महानगरपालिकाने दिनांक ३०/०६/२०१० अन्वये जलविद्युत प्रकल्प विकसनासाठीची मागणी शासनाकडे केली होती, त्यामुळे प्रथम मागणी करणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्वानुसार मे.महालक्ष्मी कोनाल ऊर्जा प्रा.लि., पुणे यांच्या मागणीचा विचार होऊन शासनाने पत्र दिनांक २८/०२/२०११ अन्वये सर्वेक्षण व अन्वेषण करुन प्रकल्पाचा तांत्रिक व आर्थिक व्यवहार्यता अहवाल तयार करण्यासाठी परवानगी दिलेली आहे.

(२) सदर जलविद्युत प्रकल्प विकसनासाठी यापूर्वीच मे.महालक्ष्मी कोनाल ऊर्जा प्रा.लि. पुणे यांना देण्यात आलेला आहे.

तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रस्तावावर माजी मुख्यमंत्री यांनी दिलेले अभिप्राय पुनर्विलोकनासाठी उचित स्तरावर विचाराधीन आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

शासनाच्या मान्यतेअभावी या प्रकल्पाच्या सल्लागारवर करण्यात आलेला खर्च वाया जाण्यास जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करणे ही बाब जलसंपदा विभागाशी संबंधित नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## व्याघ्र प्रकल्पातील गावांच्या पुनर्वसनाबाबत

**(१००) * ३४९८१ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.हरिसिंग राठोड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातील ३९ गावांचे संकल्पित पुनर्वसन गेल्या २० वर्षापासून प्रलंबित असल्याचे दिनांक १३ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील पुनर्वसित केलेल्या १६ गावांतील लोकांना मुलभूत नागरी सुविधा नसल्यामुळे त्यांनी आंदोलन केले असल्याचे दिनांक १३ सप्टेंबर, २०१० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुनर्वसनास पात्र आदिवासी कुटुंबाला रूपये १० लाख तर १८ वर्षीय मोठ्या मुलाला ही स्वतंत्र कुटुंब म्हणून पुनर्वसनाची स्वतंत्र सोय नियमात बसत असूनही अपात्र ठरविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातील गावांचे पुनर्वसन हे लोकांच्या सहमतीने करावयाचे असून लोकांची सहमती प्राप्त झाल्यावर पुनर्वसनाची प्रक्रिया सुरू करण्यात येते. राज्यात एकूण ६ व्याघ्र प्रकल्प असून त्यामधील पुनर्वसन करावयाच्या गावांची संख्या ही १०७ आहे. मार्च २०१७ पर्यंत पुनर्वसित झालेल्या गावांची संख्या ८१ असून सद्य:स्थितीत २६ गावांचे पुनर्वसन करावयाचे आहे.
(२) मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील पुनर्वसित केलेल्या १६ गावांपैकी मौजा बोरी, कोहा, कुंड, वैराट व चुर्णी या ५ गावांचे पुनर्वसन सन २००१-२००२ ते सन २०११-२०१२ या कालावधीमध्ये तत्कालिन शासन धोरणानुसार करण्यात आले. त्यानुसार या गावातील लाभार्थ्यांना शेत जमीन, घरे व राहत्या ठिकाणी सर्व नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या. उर्वरित ११ गावांचे पुनर्वसन दिनांक ०३/११/२०१२ चे शासन निर्णयानुसार पुनर्वसित होणाऱ्या कुटुंबानी पर्याय-I ची निवड केल्याने त्याप्रमाणे करण्यात आले आहे. पर्याय-I हा प्रती कुटुंब रुपये १०.०० लक्ष घेवून स्वत: पुनर्वसित होण्याचा आहे. पर्याय-I निवडणाऱ्या कुटुंबांना नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्याची तरतूद शासन निर्णयात नाही. पर्याय-II हा प्रती कुटुंब रुपये १०.०० लक्ष अनुदानाच्या मर्यादेत राहून शासनामार्फत पुनर्वसित होण्याचा आहे.

पर्याय-I नुसार पुनर्वसित गावांमध्ये मुलभूत नागरी सुविधा नसल्यामुळे दिनांक ०९/०९/२०१७ रोजी पुनर्वसित झालेल्या १६ गावांपैकी ८ गावातील गावकऱ्यांनी आंदोलन केले आहे, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांनी सन २००८ मध्ये जारी केलेल्या मार्गदर्शक सूचना, प्रचलित शासन निर्णय तसेच पूनर्वसन अधिनियम, १९९९ चे कलम-११(१) अन्वये ज्या तारखेस अधिसूचना जाहीर करण्यात येते, त्या दिवशी अस्तित्वात असलेल्या १८ वर्षावरील सज्ञान मुलगा किंवा मुलगी यास स्वतंत्र कुटुंब समजून संख्या ही अंतिम समजण्यात येते. पुनर्वसनासाठी पात्र/अपात्र कुटुंब निश्चिती करण्याची कार्यवाही संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय पुनर्वसन समितीद्वारे करण्यात येते. सदर समितीने पात्र ठरविलेल्या सर्व लाभार्थ्यांना पुनर्वसनाचा लाभ देण्यात आलेला आहे.

(४) मेळघाट व्याघ्र प्रकल्पग्रस्तांच्या समस्यांबाबत सर्व संबंधित कार्यकारी यंत्रणांच्या प्रमुखांसमवेत मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली मुंबई येथे दिनांक १८/०९/२०१७ रोजी आयोजित बैठकीत, मेळघाटातील पर्याय-I निवडून पुनर्वसित झालेल्या गावातील गावठाण क्षेत्रात विशेष बाब म्हणून नागरी सुविधा निर्माण करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. सदर निर्देशाचे अनुषंगाने गावठाण क्षेत्रात मुलभूत नागरी सुविधा निर्माण करण्याची कार्यवाही संबंधित यंत्रणेकडून सुरु झालेली असून कामे प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाडा (जि.पालघर) तालुक्यात लघुपाटबंधारे विभागामध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(१०१) * ३५३४७ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यात लघुपाटबंधारे विभागामार्फत बांधण्यात आलेल्या सरस ओहोळ बंधाऱ्याच्या बांधकामामध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहाराबाबत झाल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बंधाऱ्याचे काम घेताना ठेकेदाराने बेरोजगारांच्या नावावर त्यांच्या नकळत निविदा प्रक्रिया व अन्य कागदपत्रांवर खोटया सहया करुन रुपये ७,७२,१२४/- चा धनादेश वटविण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय. हे खरे आहे. जिल्हा परिषद पालघर लघुपाटबंधारे विभागामार्फत बांधण्यात आलेल्या सरस ओहोळ बंधाऱ्याच्या बांधकामामध्ये गैरव्यवहार झाल्याची तक्रार जिल्हा परिषद, ठाणे यांचेकडे मार्च, २०१७ मध्ये प्राप्त झाली आहे.
(२) सदर कामाचे बी-१ निविदा जिल्हा परिषदेच्या सक्षमस्तरावर मंजुर करण्यात आलेली असून काम माहे जून, २०१२ मध्ये पूर्ण झालेले आहे. कामाचे देयक रेखांकीत धनादेशाव्दारे करण्यात आलेले आहे. तसेच सदर कामाचे लेखा परिक्षण झालेले असून कोणताही आक्षेप उपस्थित केलेला नाही.
(३) उक्त प्रकरणी जिल्हा परिषदेकडून चौकशी सुरु केलेली असून सदर चौकशी पुर्ण झाल्यावर त्यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) अशी बाब नाही.

-----------------

## अतिदुर्गम तसेच नक्षलग्रस्त भागातील वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचाऱ्यांना वेतन मिळण्याबाबत

**(१०२) * ३४८९७ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात १६ आदिवासी जिल्हयातील अतिदुर्गम तसेच नक्षलग्रस्त भागात काम करणाऱ्या भरारी पथकातील वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचारी कमी वेतनात काम करीत असून मागील २४ वर्षापासून त्यांच्या वेतन व भत्त्यामध्ये वाढ करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्य विभागाच्या या भरारी पथकातील वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचाऱ्यांना मागील ५ महिन्यांपासून वेतन मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे खरे नाही.

भरारी पथकात कार्यरत मानसेवी वैद्यकीय अधिकाऱ्यांना जिल्हा नियोजन मंडळाकडून प्रतीमाह रुपये ६,०००/- मानधन देण्यात येते. त्याव्यतिरिक्त राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सन २००९-२०१० पासून रुपये ६०००/- सन २०११-२०१२ पासून रुपये १२,०००/- सन २०१४-२०१५ पासून रुपये १५,०००/- व सन २०१६-२०१७ पासून रुपये १८,०००/- अशी वाढ देण्यात आली आहे. असे प्रतिमाह एकूण रुपये २४,०००/- एवढे मानधन दिले जाते.

तथापि, आदिवासी विकास विभागाकडून प्रतीमाह रुपये ६,०००/- प्रमाणे दिले जाणारे मानधन जिल्हा नियोजन मंडळाकडून काही जिल्हयांना वेळेत प्राप्त न झाल्याने उशिरा अदा करण्यात आले आहे. मात्र राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत दिले जाणारे रुपये १८,०००/- प्रमाणे मानधन एप्रिल ते सप्टेंबर, २०१७ अखेर सर्व भरारी पथकांना अदा करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्हयात जलयुक्त शिवार योजनेची कामे यंत्राव्दारे करण्याबाबत

**(१०३) * ३५९१२ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्हयात जलयुक्त शिवार योजनेच्या कामात यंत्राव्दारे करावयाच्या कामासाठी बाजारभावापेक्षा तब्बल दोनशे टक्के अधिक दर देण्यात आला असल्याचे माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निविदेतील दराला मंजूरी देताना जलसंपदा विभागाचे अमरावती येथील कार्यकारी अभियंत्यांनी सीडब्ल्यूसी मानकानुसार जलसंपदा विभागाच्या अधिक्षक अभियंत्यांकडे मंजूरीसाठी प्रस्तावित केलेल्या दराएवेजी दोनशे टक्के अधिक दराला मंजूरी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही.

तत्कालिन जिल्हाधिकारी, अकोला यांचे निर्देशानूसार ई-निविदा प्रक्रियेव्दारे प्राप्त दरपत्रकानुसार वाटाघाटी करून दर निश्चित करण्यात आले आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लोटे-परशुराम (ता.खेड) येथील कारखान्यांनी अवैधपणे वृक्षतोड केल्याबाबत

**(१०४) * ३५७३४ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोटे-परशुराम (ता.खेड) येथील औद्योगिक वसाहतीतील अनेक कारखान्यांनी अवैधपणे वृक्षतोड करुन आपल्या कारखान्याच्या आवारात मोठ्या प्रमाणात लाकूडसाठा केला असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी स्थानिक वन विभागाच्या अधिकाऱ्यांशी असलेल्या संगनमताने ही अवैध वृक्षतोड होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अवैध वृक्षतोडीस आळा घालण्याबाबत व भ्रष्ट अधिकाऱ्यांना निलंबित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) लोटे एमआयडीसीमध्ये वनक्षेत्र दापोलीमार्फत १८ कारखान्यांची तपासणी करण्यात आली असता नंदादिप केमिकल्स प्रा. लि. लोटे, ता.खेड येथे बिगरपासी जळावू किटा ३९.७८ घ.मी. आढळून आला आहे. सदर प्रकरणी दिनांक २३/११/२०१७ अन्वये गुन्हा नोंद करून माल जप्त करण्यात आला आहे. या व्यतिरिक्त मोठया प्रमाणात अवैध लाकूडसाठा आढळून आला नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पंढरपूर (जि.सोलापूर) शहरात यात्रेच्यावेळी विविध साथीच्या रोगांची लागण होत असल्याबाबत

**(१०५) * ३६७६७ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर (जि.सोलापूर) या शहरात आषाढी व कार्तिकी यात्रेच्यावेळी विविध साथीच्या रोगांची लागण होवून रुग्णांची संख्या वाढत असून त्यात काही रुग्णांचा मृत्यू होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शहरात साथींना आळा घालण्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) नाही, हे खरे नाही.

पंढरपूर (जि.सोलापूर) या शहरात आषाढी व कार्तिकी यात्रेच्या वेळी किटकजन्य आजाराची लागण होऊन कोणत्याही प्रकारे रुग्णांची वाढ दिसून आलेली नाही. तसेच सदर कालावधीत किटकजन्य आजाराने (साथीच्या) कोणत्याही रुग्णाचा मृत्यू झालेला नाही.

(२) होय.

पंढरपूर शहरामध्ये माहे जुलै, २०१७ मध्ये किटकजन्य आजारांचे रुग्ण संख्या पुढीलप्रमाणे होती. हिवताप-०, डेंग्यू-१, चिकूणगूनिया-० तसेच माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये हिवताप-०, डेंग्यू-१, चिकूणगूनिया-० इतके रुग्ण आढळून आलेले आहेत. या ठिकाणी साथीना आळा घालण्यासाठी मागदर्शक सूचनेनुसार दैनंदिन सर्वेक्षण (ताप/कंटेनर) व धूरफवारणी तसेच अळीनाशक फवारणी, आरोग्य शिक्षण, प्रभात फेरी भित्तीपत्रके इत्यादी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत व करण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकराव्या वित्त आयोगामार्फत कामांची देयके प्रलंबित असल्याबाबत

**(१०६) * ३५७२१ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकराव्या वित्त्त आयोगातून सन २००४-०५ मध्ये जिल्हा परिषद बांधकाम विभागांतर्गत रस्ते बांधकाम, लहान पुल बांधकाम, इमारत बांधकाम इत्यादी कामे पूर्ण केलेली असतांनाही सदर कामांची देयके निधी अभावी प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रलंबित देयके अदा करण्याकरिता किती वित्तीय तरतूद करण्यात आली आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) सदर प्रकरणी जिल्हा परिषद, नंदुरबार या जिल्हयातील देयके प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले असून सदर देयके वितरीत निधीपेक्षा जादा कामांना मंजूरी दिल्याचे निदर्शनास आले आहे. नंदुरबार जिल्हा परिषदेने निर्माण केलेल्या अतिरिक्त दायित्वाच्या प्रलंबित देयके जिल्हा परिषद स्वनिधीतून अदा करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, नंदुरबार यांना कळविण्यात आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यात हत्तींनी बागा व शेतीचे नुकसान केल्याबाबत

**(१०७) * ३५७१३ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यात हत्तींना भरवस्तीतील केळी, माड, बागायतींचे व शेतीचे नुकसान केले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जंगली हत्तींमुळे येथील ग्रामस्थांच्या जीवाला धोका निर्माण झाला असून येथील भातशेती/फळबागा हत्तींपासून वाचविणे एक आव्हान बनले आहे तसेच कुटूंबाचा उदरनिर्वाह करणे येथील शेतकऱ्यांना कठीण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना हत्तीपासून होणाऱ्या नुकसानाची योग्य भरपाई देऊन जंगली हत्तींना रोखण्यासाठी कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) दोडामार्ग वनपरिक्षेत्रामध्ये तिलारी धरण परिसरात हेवाळे, आयनोडे येथे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये ९ विविध शेतकऱ्यांचे भात, नारळ, काजू केळी व सुपारी या शेतपिकांचे हत्तीने नुकसानी त्या निदर्शनास आले आहे.

(२) व (३) हत्तीने नुकसान केलेल्या ९ प्रकरणांमध्ये प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार संबंधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई रुपये ९२,५८०/- इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे.

मानव-हत्ती संघर्ष कमी करण्याच्यादृष्टीने क्षेत्रियस्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

- वन कर्मचारी/अधिकारी यांचेमार्फत दररोज दिवस-रात्र गस्त घालण्यात येते.
- स्थानिक गावकऱ्यांचे मदतीने टॉर्च, फटाके, अग्निबाण इ.चा वापर करुन व हाकारा गट तयार करुन हत्तींना शेती व मानवी वस्तीपासून दूर नेण्यात येते.
- पिक नुकसानी पंचनामे प्राधान्याने पूर्ण करुन त्याची भरपाई वेळेच्या आत अदा करण्यात येते.
- हत्तींच्या हालचालींवर लक्ष ठेवण्याकरीता हेवाळे, बांबर्डे बिटात निरीक्षण टॉवर निर्माण करणेत आले आहेत.
- हत्ती प्रतिबंधात्मक उपायाकरीता फलक लावण्यात आलेले आहेत.
- गावातील लोकांनी हत्ती प्रतिबंधात्मक उपाय स्वत:च्या शेतीत राबवावे याकरीता कार्यशाळेचे आयोजन करुन कर्मचारी व ग्रामस्थ यांना प्रोजेक्टरमार्फत हत्ती या वन्यप्राण्याबाबतची माहिती देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पांझरा नदीवरील निम्न तापी तथा अक्कलपाडा प्रकल्पामुळे नुकसान झाल्याबाबत

**(१०८) * ३६८४७ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांझरा नदीवरील निम्न तापी तथा अक्कलपाडा प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरुन प्रकल्पाचे पाणी असंपादित जमिनीवर पसरल्यामुळे शेत पिकाचे नुकसान झाल्याचे तसेच संपादित क्षेत्रातील तामसवाडी गावाची गाव विहीर पाण्याखाली गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत तसेच संपादित क्षेत्रातील तामसवाडी गावासाठी नवीन गाव विहीर तयार करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे. अक्कलपाडा प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरल्याने प्रकल्पाचे पाणी बुडीत क्षेत्रातील जमिनीवर पसरल्यामुळे शेत पिकांचे नुकसान काही प्रमाणात झाले आहे. परंतू संपादित क्षेत्रातील तामसवाडी गावाची गाव विहीर पाण्याखाली गेलेली नाही.
(२) उक्त प्रकरणी शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत महसूल यंत्रणेमार्फत बुडीतात येणाऱ्या शेत जमिनीवरील पिकांचे नुकसानीचे पंचनामे करण्यात आले आहेत व सदरील पिकांचे मूल्यांकनाची कार्यवाही कृषी विभागामार्फत प्रगतीत आहे. पिक नुकसानीचे मूल्यांकन पुर्ण झाल्यावर संबंधित शेतकऱ्यांना मोबदला अदा करण्याची कार्यवाही क्षेत्रियस्तरावर तात्काळ करण्यात येईल. तसेच तामसवाडी पुनर्वसन गावठाणासाठी पाणीपुरवठा योजनेचा उध्दव हा बुडीत क्षेत्राच्या टोकाशी असल्याने भविष्यात विहीरींचे पाणी दुषित होण्याचा धोका लक्षात घेऊन व प्रकल्पबाधितांचे मागणीनुसार व प्रशासनाच्या सूचनेनुसार नवीन गाव विहीर तयार करण्यासाठी व पाणीपुरवठा योजना बळकटीकरणासाठी क्षेत्रिय कार्यालयाकडून जिल्हाधिकारी, धुळे कार्यालयास अंदाजपत्रक व प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर.